REGISTERED N. No. 4

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ..........................६४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस .... ........०१

Annual in arrears ...
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy .............................. 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line....3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 3 FEBRUARY 1902 NO 5

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख ३ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ० अंक ५

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---


### खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरीं पेटंट वाचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉन्ट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व ह्याबद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनचें मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठ, मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस........................४०
१९ „ हंटिंग.............................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ............२५०

मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.

रास्कोप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह............२०
१९ „ मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ..................२२
१९ „ हाफ हंटिंगचें................२०
१९ „ हंटिंगचें ........................२०
१४ „ रिस्ट वॉच ........................२०

इनॅमल्ड मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ „ हंटिंग.............................२०
१४ „ रिस्टवॉच..........................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग..............................३५
१८ व १९ „ ओपनफेस............३०
१९ „ सेकंद कांट्यासह ............३२
१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ....................३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ........................ ४९

लेडीज वॉचेस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

सी. हीनीगर आणि कंपनी.

ओरिजिनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

### फीमेल ट्रेनिंग कालेज

( आमच्या शिक्षक मित्राकडून )

अकोलें येथें एक नवीन फीमेल ट्रेनिंग कॉलेज निघणार आहे. त्यामध्यें स्वतंत्र रीतीनें आपल्या भगिनी किंवा स्त्रिया आपल्या खर्चानें ठेवण्यास तयार असणारे लोक आपल्या समाजामध्यें हल्लींच्या स्थितीला फारच थोडे निघतीलसे वाटतें. कारण आपली समाज स्थिति अजून बरीच मागें आहे. तेव्हां अशा स्थितींत या ट्रेनिंग कॉलेजाची भरभराट होण्यास व एकंदर स्त्रीशिक्षणास चांगली मदत होण्यास खालीं लिहिलेले उपाय आमच्या मतें विचार करण्या सारखे आहेत.

जे गृहस्थ मोठे श्रीमान असतील व जे शिक्षक बराच मोठा पगार मिळविणारे असल्यामुळें खाऊन पिऊन दोन रुपये मागें टाकण्यास समर्थ असतील तेच कदाचित् आपल्या स्त्रिया, मुली किंवा भगिनी स्वतंत्र रीतीनें अकोल्यास ठेवूं शकतील, पण असे लोक फार थोडे; कारण स्त्री शिक्षणाविषयीं फार कळकळ वाटणारे हे लोक असले तरी स्वतः त्रास, गैरसोय व खर्च सोसणारे फार कमी. तसेंच ज्या साधारण स्थितींत ज्या शिक्षकांना व गृहस्थांना आपल्या स्त्रिया अकोल्यास कॉलेजांत पाठविण्याची उत्कट इच्छा असेल त्यांचे हेतु, खर्चाचा व गैरसोईचा विचार केला असतां, जागच्याजागीं मुरण्याचा बराच संभव आहे. आणि जे अगदीं गरीब असून अकोल्या शिवाय इतर ठिकाणीं राहणारे असतील यांच्या विषयीं तर बोलावयासच नको. कारण गरिबी हें कारण उघडच आहे.

यासाठीं आमचें असें मत आहे कीं अशा आपल्या समाजस्थितीच्या वेळीं स्त्रीशिक्षणाचा चांगला प्रसार होईपर्यंत कांहीं विशेष उत्तेजनकारक पद्धतीचा स्वीकार केला पाहिजे. ह्मणजे असें कीं ज्या मानानें या कालेजांत स्त्रिया येणें असतील व ज्या गृहस्थांची आपल्या स्त्रिया तेथें ठेवण्याची इच्छा असेल त्या मानानें त्यांची बदली अकोलें येथेंच व्हावी, ह्मणजे स्त्रियांना पर ठिकाणीं स्वतंत्र ठेवण्यास जो खर्च येईल तो येणार नाहीं. आणि जर सरकार या स्त्रियांना कॉलेज क्रम पुरा झाल्यावर ज्या ठिकाणीं त्यांचे पती शिक्षक असतील त्याच ठिकाणीं नेमण्याचें ठरवील, अगर ज्या ठिकाणीं त्यांच्या स्त्रियांना नेमण्यांत येईल तेथल्याच ए. व्ही. स्कुलांत त्यांच्या पतींची अगर भावांची बदली करण्यांत येईल असें ठरवील तर बराच फायदा झाल्याशिवाय खचित राहणार नाहीं आणि या कामाकरितां जर शिक्षकांना प्रथम थोडी बहुत बढती देण्यांत येईल तर पुष्कळ शिक्षक आपल्या स्त्रियांना या कालेजांत ठेवतील यांत शंका नाहीं.

हें सर्व ठीक आहे पण सर्वच स्त्रीशिक्षणाहितेच्छु लोकांची अकोल्यास कशी बदली करतां येईल ? कांहीं लोकांची अकोल्यास बदली केल्यावर आणखी जे कांहीं स्त्रीशिक्षणाचे कनवाळू शिक्षक राहतील त्यांच्या करितां एक उपाय आहे व तो अमलांत आणण्याचा जर अधिकारी लोक विचार करितील तर स्त्री शिक्षणाची फार भरभराट झाल्यावाचून राहणार नाहीं. तो उपाय असाः— सदहू कॉलेजाचे वार्षिक अभ्यासक्रम ठरवून टाकून ते सर्वत्र प्रसिद्ध करावेत व त्या बरहुकूम जे गृहस्थ आपल्या स्त्रियांना शिकवून तयार करतील त्यांची परीक्षा कॉलेजाच्या वार्षिक परीक्षेबरोबरच घेण्यांत यावी; व नंतर त्यांना त्यांच्या योग्यते प्रमाणें जागाहि देण्यांत याव्यात अशा रीतीनें पुष्कळ शिक्षकिणी अनायासानें तयार होण्याचा बराच संभव आहे व पुष्कळ शिक्षकांना स्वतः घरीं प्रयत्न करण्यास उत्तेजन मिळून एकंदर स्त्रीशिक्षणाचा फैलाव झपाट्यानें होईल हें खचित.

आतां पहिल्या मुद्याप्रमाणें याहि मुद्यांत पति पत्नी अथवा मास्तर व मास्तरीण यांना एकाच गांवीं ( एकाच शाळेंत नव्हे ) नेमलें जाण्याची फार जरूरी आहे. कारण एवढ्या एकाच गोष्टीनें सुद्धां स्त्रीशिक्षणाची योग्यता व लोकप्रियता फार वाढण्याचा संभव आहे. कारण जेव्हां एकादी स्त्री व विशेष करून विधवा स्त्री परक्या गांवीं स्वतंत्रपणें एकटी राहते तेव्हां, आपल्या हल्लींच्या अपक्क समाजरचनेच्या योगानें, जरी ती चांगली असली तरी अज्ञान लोकांच्या वृथा निंदेस पात्र होण्याचा बराच संभव असतो आणि कांहीं लबाड लोकांच्या काव्यामुळें कित्येक ठिकाणीं अशा प्रकारच्या अबला संकटांतही पडल्या आहेत. ह्मणून ज्या ठिकाणीं मुलींची शाळा असते त्या ठिकाणीं (कारण तेथें मुलांची शाळा असतेच ) मुलींच्या शाळेवर जी शिक्षकीण नेमली जाईल तिचाच पति, भाऊ किंवा दुसरा कोणी जवळचा आप्त नेमला जावा. असें केलें असतां त्या गांवीं त्या शिक्षकिणीचा मोठा मान राहील. या शिवाय असें केल्यापासून दुसरा एक मोठा असा फायदा होईल कीं त्या गांवांतील सभ्य स्त्रिया तिच्याशीं मिळून मिसळून वागतील व अशा रीतीनें एकंदर स्त्रीशिक्षणाला फार मदत होईल यांत शंका नाहीं. ह्मणून या विचारांचा अधिकारी वर्ग चांगला विचार करतील अशी आह्मी आशा करितों.

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य १० शके १८२३

## सरबराई

बिगारीची पद्धती फार जुनी आहे. ही मोंगलाईत चालूं होती तशी पेशवाईतही चालूं होती. इंग्रजींत कायद्यानें बिगार बंद केली आहे. बिगारीचा कायदा लोक फारसा पाळीत नाहींत; किंबहुना बिगारीचा कायदा पाळणें ह्मणजेच तो कायदा मोडणें होय असा लोक ध्वनित अर्थ काढीत असतात. बिगारीलाच 'सरबराई' ह्मणून एक दुसरें गोड नांव आहे. या सरबराईचें बंड आमच्या प्रांतांत फार चालतें. सरबराई ह्मणजे एका प्रकारची चाकरीच समजतात. गांवकऱ्यांवर सरकारची सरबराई करण्याची जबाबदारी आहे. ही जबाबदारी पाटील पटवारी गांवकरी लोकांवर विभागून देतात. सरकार ह्मणजे सरकारी अधिकार चालविणारा माणूस होय. पोलिसचा शिपाई, सरकारी कारकून, तहशिलदार, असिस्टंट कमिशनर, डिपुटी कमिशनर, इनस्पेक्टर, इत्यादि सर्व मंडळी 'सरकार' या शब्दाखालीं येतात, अर्थात् कमिशनर व रेसिडेंट हे अधिकारी 'सरकार' आहेत हें सांगण्याची जरूर नाहीं, वरील वर्णनाचें सरकार ज्या गांवाला जातें त्या गांवच्या लोकांनीं त्यांची नीट संभावना करावी असा सरबराईचा अर्थ आहे, ज्या ह्या अधिकाऱ्यांच्या गरजा प्रमाणें लागणारे पदार्थ, सामानसुमान, वाहन वगैरे गोष्टी गांवकऱ्यांनीं पुरविल्या पाहिजेत. अल्पस्वल्प सरकारापासून तों मोठ्या सरकारापर्यंत सरबराई करावी असा रयतेचा धर्म होय असें सरकारी अधिकारी मानीत असतात. व सरबराई ह्मणजे जुलुमाचा धर्मादाय होय असें रयत मानतात.

सरबराईच्या अमदानींत अन्याय व जुलूम फार होऊं लागले ह्मणून त्या संबंधानें सरक्युलर निघालीं आणि सरकारी माणसानें घेतलेल्या सामाना बद्दल व चाकरी बद्दल पैसा चुकता करावा असा हुकूम सांगण्यांत आला. ज्या सरकारी माणसांना फिरावें लागतें त्यांच्या सोयी साठीं हा सरबराईचा प्रकार प्रथम रूढींत आला पण सरकारी माणसांचा त्रास रयतेला फार होऊं लागला ह्मणून पुढें सरबाराईचा दाम चुकता करण्यांत यावा असा हुकूम झाला. हा हुकूम कागदावर फार चांगला दिसतो पण व्यवहारांत तो हुकूम सरकारी अधिकारीच चांगलासा पाळीत नाहींत. कोणाचीही सरबराई फुकट घ्यावयाची नाहीं असा हेतु धरणारे व वागणारे अधिकारी विरळा आढळतात. पुष्कळशा अधिकाऱ्यांना पैसा खर्चावासा वाटत नाहीं आणि डामडौल, चैन व ऐषआराम तर पाहिजे असतात; अशा प्रसंगीं एकाला लूट व दुसऱ्याची मर्जी राख असा प्रकार हाता खालील चाकर लोक डोळ्यापुढें ठेवीत असतात. या प्रकारामुळें अन्यायानें अन्याय वाढत जातो आणि अखेरीला सरबराईला वाईट नांव लोक ठेवूं लागतात.

ताजेंच उदाहरण घ्या. अलिशान नामदार रेसिडेंट कर्नल बार साहेब येऊन गेले. त्यांच्या आदरसत्कारासाठीं सार्वजनिक फंड कांहीं उभारण्यांत आला नव्हता. प्रत्येक जिल्ह्यांत त्यांचा मानपान उत्कृष्ट ठेवण्यांत आला. या मानपानाला खर्च किती लागला व तो कोणी कोणी कसकसा दिला याचा विचार करण्याविषयीं आह्मी मुद्दाम सूचना करितों. जंगला मध्यें मंगल गोष्टी डोळ्या पुढें उभ्या होतात आणि अधिकारी खूष होऊन जातात ही गोष्ट समाधानाची होय. पण या सर्व मंगल गोष्टींचा खर्च कोणी केला? आमचे सरकारी अधिकारीच या प्रश्नाचें उत्तर चांगलें देतील आणि ह्मणूनच आह्मी त्यांस हा प्रश्न घालीत आहों. 'अनापुत्र बळिं दद्यात्' या न्यायानें सरबराई होत असते असा आमचा ग्रह आहे आणि तो खोटा मानण्याला आमच्या पाशीं कांहींच साधनें नाहींत. आमचे लोक पहुणचारा विषयीं विख्यात आहेत आणि ते सरकारी माणसांचा पाहुणचार मनोभावानें करितात. पण अलिकडे सरबराईची दंगल फार माजली आहे, लोक गरिबीला विशेष पोंचले आहेत, आणि सरकारी करभार रयतेला मोठा द्यावा लागतो. अशा स्थितींत सरबराईचें फुकट ओझें रयतेनें वहावें हें आह्मांला योग्य दिसत नाहीं. बरोबर दाम चुकविल्या शिवाय गावकऱ्यांनीं सरकारी माणसांची सरबराई करूं नये अशी आमची लोकांस सूचना आहे.

लष्करी कामासाठीं बिगार धरणें कायदेशीर आहे असें ठरविण्यासाठीं पंजाबांत नवीन कायदा होत आहे. पंजाबचे लेफटेनंट गव्हरनर साहेब ह्मणतात कीं, बिगारीची पद्धती जुनी आहे, आणि सरकारी कामाला ती अंमलांत आणिलीच पाहिजे; या गोष्टीचा कायदा सहा आठवड्यांत झाला पाहिजे आणि या संबंधांत लोकमत कांहीं कामाचें नाहीं. इंग्रजी न्यायदृष्टि व व्यवहारदृष्टि या पंजाबच्या कायद्यांत पूर्ण उतरणार आहे. पंजाबच्या धर्तीवर सांप्रतच्या सरबराईला कायद्यानें न्यायाचें स्वरूप येईल तर सरबराईला वाईट कोण ह्मणणार आहे? पण तसें होईपर्यंत जुलुमाचीं स्थळें दाखविणें हें आमचें कर्तव्य आहे आणि या पुढील कर्तव्य सरकाराचें आहे.

## महाराची भीक

महाराची भीक ह्मणजे एक प्रकारचा सरकारी साराच आहे. दर एकराच्या वहितीला गांवच्या कामदार महाराला भीक ह्मणून धान्य किंवा पैसा मिळत असतो. ही भीक शेताच्या मालकाला द्यावी लागते. खरोखर ही भीक नसून हा सरकारचा कर मात्र आहे. पूर्वकाळीं महार लोकांस जी भीक ह्मणून मिळत असे ती हल्लीं सरकारी साऱ्या प्रमाणें वसूल करण्यात येते. वतनदार महारांची भीक बुडवावी असा आमचा हेतु नाहीं; पण ही भीक ह्मणजे सरकारी मामला असून तो जबरदस्तीचा आहे असें ह्मणतात. पूर्वकाळीं महाराच्या भिके प्रमाणें प्रत्येक शेताच्या मालकाला नारूकारूचे हक्क द्यावे लागत असत. हे हक्क जुन्या समाजरचनेवर बसविलेले आहेत. गांवच्या सुतारानें शेतीचीं आऊतें करून द्यावीं, जुनीं नीट करावीं आणि शेतीच्या कामाला लागणारें सर्व सुतारकाम त्यानें किंवा त्याच्या वतीनें दुसऱ्या सुतारानें करावें. सुतार प्रमाणेंच हजामानें वर्ष भर हजामती कराव्यात आणि परिटानें कपडे धुवावेत. महारानें मेलेलें ढोर ओढून न्यावें, शेतीचें रक्षण करावें आणि गावची सफाई ठेवावी. ग्रामजोशानें गांवकऱ्यांचीं धर्मकृत्यें चालवावीं. तशीच इतर बलुतेदार मंडळींनीं आपापलीं कामें करावीत आणि या कामगिरी बद्दल त्यांस शेतकरी कांहीं ठरीव पीक देत असे. जोशाला जोशीपणाचा हक्क, धोब्याला त्याचा हक्क, हजामाला त्याचा हक्क, सुताराला त्याचा हक्क, आणि महाराला त्याचा हक्क, तसेच दुसऱ्या बलुतेदारांचे हक्क ह्मणून प्रत्येक शेतकरी आपल्या पिकांतून ठरीव धान्य वगैरे पदार्थ देत असे.

हक्क देण्याची ही चाल इंग्रजी खालीं लोपत चालली आहे. गांवचा जोशी, सुतार, हजाम, धोबी इत्यादि कर्मकारांशीं सरकाराचा कांहींच संबंध पडत नाहीं. फक्त वतनदार महार मात्र सरकाराला कबूल आहेत. सरकार त्यांच्या हातून चाकरी घेते पण त्यांचा रोजमुरा देण्याचें काम सरकारानें शेतकऱ्यांवर सोंपविलें आहे. शेतकऱ्यांना महार विचारीत देखील नाहीत. फक्त हंगामाच्या वेळीं भीक मागण्याला मात्र दारांशीं उभे राहतात.

मुलकी कायदा नवा झाला, नवीन दरठरोती झाली, सारा वाढविण्यांत आला पण महाराच्या भिकेचा हक्क मात्र तुटला नाहीं. सरकारी सारा जबरदस्त आहे आणि या पुढें ही महाराची भीक सरकारानें ठेववावी ही गोष्ट आह्मांस नीट दिसत नाहीं. सरकारानें आपल्या मुलकी कारभारासाठीं वतनदार महारांस चाकरींत ठेवावें आणि ऐन काळीच्या वसुलांतून त्यांचा पगार चुकता करावा. लोकांच्या मागें हा भिकेचा दंडा असूं नये. प्रस्तुतच्या कालमानाला महाराची भीक बंद झाली पाहिजे असें आमचें मत आहे. महाराची भीक बंद करा या ह्मणण्याचा अर्थ त्यांच्या चाकरी बद्दल त्यांस कांहींच वेतन मिळूं नये असा नाहीं; फक्त त्यांच्या चाकरीबद्दलचा पगार रयतेवर भिकेच्या द्वारानें न बसवितां सरकारी खजिन्यांतून दिला जावा.

पोटासाठीं धर्माचा त्याग कसा होतो याचीं उदाहरणें मिशनरी संस्थांतील मंडळी मध्यें पुष्कळ सांपडतील. ख्रिस्ती धर्माचा विस्तार दिवसे दिवस फार होत आहे. तो धर्माच्या दृष्टीनें न होतां लोक पोटापाण्याची सोय पाहून धर्मांतर करितात असें आढळून येईल. सर्व मिशनरी पेक्षां पंडिता रमाबाई ही मोठी पराक्रमी बाई आहे. कांहीं वर्षांपूर्वीं या बाई उमरावतीस आल्या होत्या तेव्हां यांची ओळख निदान नांवानें तरी पुष्कळांस आहे. पुण्यास पंडिता रमाबाईचें शारदासदन प्रसिद्ध आहे. तशींच एक 'कृपासदन' व एक 'मुक्तिसदन' अशीं दोन सदनें पुण्याजवळील केडगांव येथें मशहूर आहेत. गेल्या केसरीच्या अंकात हीं तीन सदनें ह्मणजे तीन तुरुंग आहेत, आणि पंडिता बाई ही जेलरीण आहे असें ह्मटलें आहे. ही पंडिता मोठी भुरळ पाडणारी आहे. तिच्या काव्याला पुण्याची मोठमोठीं माणसें बळीं पडलीं आहेत. तिचीं सदनें ह्मणजे येशु ख्रिस्ताच्या शाळा आहेत आणि तेथें दोन अडीच हजार मुली व बायका मिळून गुलामगिरींत पडल्या आहेत असें वर्तमानपत्रद्वारा कळतें. पंडिता रमाबाईच्या जाळ्यांमध्यें गेल्या दुष्काळांत पुष्कळ मुली व स्त्रिया सांपडल्या. ह्या सर्व नव्या धर्मांत नेल्या आहेत. गेल्या दुष्काळांत एक लक्ष रुपये १७०० तरुण मुलींच्या अन्नवस्त्राकडे व शिक्षणाकडे खर्चण्यांत आले. हा खर्च मोठा खरा पण त्याच्या बुडाशीं पुष्कळशा स्त्रियांची धर्मभ्रष्टता दिसून येत आहे. आपल्या लोकांनीं या सदना संबंधानें अवश्य विचार केला पाहिजे आणि आपल्या हिंदु धर्मांतील प्रौढ मुली धर्मभ्रष्ट न होतां व पंडितेच्या दास्यत्वांत न राहतां नीट मार्गाला लागतील अशा विषयीं काळजी घेतली पाहिजे.

पंडिता रमाबाई आपल्या रिपोर्टांत लिहितात कीं, हिंदु धर्माच्या लोकांस धन्यवाद किंवा आभार प्रदर्शन ही गोष्टच माहित नाहीं. ख्रिस्ती झाल्या पासून आभार मानण्याची आनंदकला पंडितेच्या मनांत उपजली आहे. या आनंद कलेचा विकास पाहून आणि वरील सदनाला मदत करणाऱ्या गृहस्थाचें अभिनंदन केलेलें वाचून या पंडितेविषयीं विस्मय वांटल्या वाचून राहणार नाहीं. कोणी चांगली गोष्ट केली तर त्या बद्दल त्याचे आभार मानण्याची गोष्ट हिंदु लोकांस माहितच नाहीं. व हिंदु लोक ह्मणतात कीं, पूर्व कर्मानेंच आपल्यास सर्व गोष्टी मिळतात, तेव्हां कोणी कोणाचे आभार मानीत नाहींत. असा तर्कशास्त्राचा अद्भुत तारा ज्या पंडितेच्या डोक्यांत प्रकाश पाडतो तिची सुगुणता किती वर्णन करावी! निदान पंडितेच्या सदना संबंधानें गर्हणीय प्रकार पाहून आह्मास तिचे आभार मानावे अशी बुद्धि कधीच होत नाहीं ही दुःखाची गोष्ट होय. जी गोष्ट पंडितेच्या सदना विषयीं आहे तीच पुष्कळशा मिशनरी संस्था संबंधानें खरी वाटेल आणि ह्मणूनच आपल्या लोकांनीं मिशनरी लोकांपासून फार दूर रहावें हें बरें.

## मल्ल विद्या

अलीकडे आपल्या शाळाखात्याचें लक्ष मल्ल विद्येकडे विशेष आहेसें दिसतें. मुलांच्या शारीरिक संपत्ती संबंधानें मे. कॅंडी साहेब फार काळजी घेतात ही मोठी समाधानाची गोष्ट होय. वरिष्ठांचा मनोदय

पाहून हाताखालील अधिकारी मंडळीही मुलांचीं शरीरें सदृढ बनविण्याविषयीं चांगलें परिश्रम घेतात. अभ्यासाचा बोजा विद्यार्थ्यांवर भारी पडतो आणि त्यामुळें विद्यार्थी अल्पवयांतच खुजे, निशक्त व मंद होतात असा पुष्कळांचा आक्षेप होता. हा आक्षेप अंशतः तरी प्रस्तुतच्या चळवळीनें दूर होण्याचा संभव आहे. विद्यार्थ्यांचें लक्ष पुरतेपणीं खेळाकडे ओढलें आहे ही गोष्ट गांवोगांवच्या शाळांतूनहि दृष्टीस पडेल. आपली अंगकाठी मजबूत असावी व आपण पहेलवान व्हावें, आणि कसरतीमध्यें व निरनिराळ्या खेळांमध्यें आपण पुढें असावें अशा तऱ्हेची ईर्षा विद्यार्थी मंडळींत दिसून येते. हें सर्व श्रेय मे. कॅंडी साहेबांस आहे यांत शंका नाहीं.

मल्ल विद्येची अभिरुची विद्यार्थ्यांस लागावी, व्यायामाचे खेळ त्यांनीं खेळावे आणि अशा रीतीनें त्यांनीं आपली शरीरसंपत्ती वाढवावी या हेतुनें एक 'वऱ्हाड मल्ल समाज' नांवाची संस्था स्थापण्यांत आली आहे. या संस्थेस अलिशान रेसिडेंट कर्नल बार साहेब यांचा मुख्य आश्रय आहे. मे. इलियट साहेब कमिशनर हे समाजाचे अध्यक्ष आहेत. या समाजाला राजाश्रय थोडा आहे तरी राजाची अधिकारी मंडळी व इतर सुज्ञवस्तु मंडळी यांचा आश्रय आहे, या अर्थी या संस्थेचा फंडहि मोठा उभारण्यांत येईल अशी अम्ही आशा करितो. या संस्थेचे आश्रयण सभासद होण्याला पन्नास रुपये देणगी द्यावी लागते. इतर सभासदासाठीं सालीना ६ रुपये वर्गणीचा दर निश्चित केला आहे. ज्या शाळा किंवा ज्या मंडळ्या या संस्थेचा आश्रय करूं इच्छितील त्यांनीं आपापल्या शक्ती प्रमाणें १२ किंवा ६ किंवा ३ रुपये वर्गणी दिली पाहिजे. ही संस्था चांगली नांवारूपास येत आहे हें पाहून श्रीमान् लोक आपला उदार आश्रय देतील अशी आम्हांस पूर्ण आशा आहे. आणि प्रस्तुतच्या व्यवस्थापक मंडळीनें आरंभलेला कार्यक्रम सुसिद्धीला जावो असें आम्ही मनापासून इच्छितों.

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY

3 1902

Lord Curzon does India a great service in so far as he vindicates the Land Revenue policy of India. The service relates to the fact that we shall no longer be a dupe of false hopes. There is now no hope of a revision in the Land Revenue system of India. It is declared to be the best and the perfect system that has ever obtained in India. If it be defective in some aspect or another it is said to be the fate of all human systems. This is a very fine ideal, and we would be glad if the Government achieve such a high point in administrative perfection.

The resolution of the Government of India gives a fatal blow to their critics. Without a refutation of their objections, the resolution is as ... of the Government can be. It gains as much in weight and influence as the authority of the Government can lend to their resolution. There is now no point in attempting to satisfy the Government of the fallacy of their resolution. We must surrender ourselves to the good will of the Government and must await another opportunity till we feel our way of ventilating our grievances.

The Land Revenue system admits then of no change. It seems to be permanent and unchanging for some years to come. The over—assessment of land is an evil to which we must submit with good grace.

The Government have noticed with alarm the rise of a new class of middle-men who stand between the state and the ryot who cultivates the land. The middle—man is a land—lord on a small scale. He is interested in realizing a moderate income by way of interest upon the capital he has invested in land. It is this middle-man who is to some extent responsible for the indebtedness of the agriculturists. The old holders of land from the Government have been reduced to a state o serfdom. They live on labour o cultivation. It is to the latter clas of wage-people that large additions o agriculturists are being made from year to year. There is a great danger looming in this gradual transfer of land from cultivators into the hands of the middle—man. The grievances of the masses are being accentuated by these transfers which are numerous in the course of the last five years. The results of two famines will be prominent in the transfer of holdings in Berar.

It is this danger which the Government should avert by all prompt and immediate measures. The remedy should lie in helping the indebted people from the clutches of their money—lenders. There should be a legislative measure to undo all unconscionable dealings and to check the heavy rates of interest. All policy should be against the alienation of land from the hands of the cultivators. The people of Berar want in general a great help from the Government. If it does not reach them in time there is the strongest reason to expect a precipetous decline of our peasantry.

In this connection we intend to bring to the notice of our readers some cogent remarks of Mr. Thorburn on the evils of the 'British system' in India. He observes to the following effect:—

"To the cold calculating eye of the statistician, whether Secretary of State for India, or bureaucratic head of a local government, our great dependency is a unit progressive or retrograde, according to the volume of the output. So viewed, as there is annually an increase in production, trade, revenue, litigation, cultivated area and railway mileage, there is consequently annual growth of prosperity. To the sympathetic discernment of the disinterested statesman, the man who considers producers as well as production, India contains not one unit, but 300 millions of units, each a struggling atom of humanity, lying prostrate and bleeding under the wheels of the Juggernath Car called progress on Western lines. If a country's prosperity is measured by ... a people depends on the width of that wealth's diffusion. India, for an agricultural country, has wealth, but as our "system" has accumulated most of it in the hands of a comparatively small number of persons, the people, the masses, are poor sweated creatures. A part of the system, which has had these unfortunate consequences, is that by which the land revenue demand—in itself moderate except I understand, in parts of Madras and Bombay—is levied on fixed dates immediately after the time of harvest.

The reduction of the land revenue demand, it is worth noting that under our system our very generosity in exacting less from land holders than was the habit of the Governments which preceded ours, has been a prominent cause of the indebtedness and undoing of the peasantry. So much so is this the case that it is a question whether peasant agriculturists as a body would not be better off, and less discontented, if the land revenue were enhanced rather than reduced. Our "system" so operates that it enables money-lenders to easily exploit the ignorant poor, hence were the Government not only to reduce but to surrender altogether its land revenue, I think the only result would be that in a few years the money foregone would be in the strong boxes of the usurers."

## वऱ्हाड

हवामान— थंडीचें मान साधारण आहे. दिवसा ऊन कडक तापतें. हवा रुक्ष आहे. सार्वजनिक आरोग्यही ठीक आहे.

मे० कुमार श्री हरभामजी रावजी डेपुटी कमिशनर हे एक आठवड्याच्या क्रिकेटच्या रेजवर बाहेर प्रांतीं गेले आहेत.

आज प्रातःकाळीं आठ वाजतां डाक्टर रेली साहेब यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतेच विलायतेहून आलेले डाक्टर मट यांचें व्याख्यान येथील टाऊनहालांत इंग्रजींत होणार आहे. व्याख्यानाचा विषय 'मच्छर हिंवताप' हा आहे.

मे. इलियट कमिशनर साहेब हे गेल्या गुरुवारीं येथें येऊन शुक्रवारीं उमरावतीस रवाना झाले. हें आगमन एकाएकीच झालें. व या मुक्कामाला खजिन्याची तपासणी केली.

## नोटीस

रा. रा. मारुती गणेश जिनिंग कंपनी आकोट तर्फे म्यानेजर नारायण माणकेश्वर यांस—

सदाराम छोगालाल मारवाडी दुकान आकोट तर्फे वहिवाटदार लाधुराम नेनचंद याचा नयगोपाळ. वि० वि० तुमचे १०० खंडी सरकीचा मिती मार्गशीर्ष शुद्ध १९ संवत १९५८ ह्मणजे तारीख २९।१२।१९०१ रोजीं दर ४ रुपये प्रमाणें प्रेमसुक रंगा दलाल याचे मार्फतीनें आह्मी सवदा केला. मी तुमचेकडे मनुष्य सरकी मोजून घेण्याकारितां पाठविला असून तुह्मी सरकी मोजून देत नाहीं; करितां ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत सरकी मोजून द्यावी व तिची किंमत घेऊन जावी. असें न केल्यास हल्लींचे बाजार भावा प्रमाणें नुकसान भरून घेतली जाईल. कळावें. तारीख ३ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ०

सही

सदाराम छोगालाल मारवाडी

रहाणार आकोट.

दस्तुर महादेव पांडुरंग.

## नोटीस

बेशमी केशव कृष्ण कुळकर्णी रहाणार पळसोद तालुके आकोट पोस्ट दहिहंडा.

यांस:-

मी खालीं सही करणार या नोटिशीनें असे कळवितों कीं, तुमचा चुलता मयत अमृत गणेश कुळकर्णी यांजला मी ताबेगहाणखत रुपये १५०० पंधराशेचें मौजे पळसोद येथील शेत सर्व्हे नंबर १९३, व मौजे धामन बुजरुक येथील शेत सर्व्हे नंबर ३९ पैकीं या दोन्ही शेतांचें पीक व्याजा ऐवजी खाण्यास दिलें होतें. ते रुपये १५०० शें मी चार पांच महिन्य पासून तुह्मांस घेण्यास ह्मटलें असतां तुह्मी आज पावेतों घेतलें नाहीं. करितां मी सदहू रुपये १५०० शें रा. रा. शंकरलाल नरसिंगदास मारवाडी साहू दुकान आकोट यांचें दुकानावर तुह्मास देण्याकरितां अनामत ठेविले आहेत. तर तुह्मी ही नोटीस पावल्यापासून चार दिवसांचे आंत ते रुपये घेऊन जाऊन माझा दस्तैवज व रुपयांची पावती त्यांस द्यावी. असें न केल्यास माझ्यावर कोणतीच जबाबदारी राहणार नाहीं. कळावें तारीख १ फेब्रुवारी सन १९०२ इसवी.

सही

शेख अकबर वलद शेख चांद

लोंढारी रहाणार पळसोद

दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी ज्यानकीराम हुलाशीराय रहाणार तामगांव तालुके जळगांव जि० आकोला

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे तर्फे तुह्मी मुखत्यार असून कुलमुखत्यारपत्रही झाले आहे. परंतु तुह्मी आज पावेतो केलेलें काम आह्मास मंजूर झालें नाहीं. तुह्मी आपले स्वसंतोषानें वाटेल तसे करितां. प्रसंगीं आह्मास विचारण्याची मुद्दां जरूर ठेवीत नाहीं. ह्या वरून तुह्मास नोटीस देण्यांत येते कीं सदहू नोटिसीनें यापुढें तुमचें कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे तरी आमचे कागदपत्र आठ दिवसाचे आंत आणून रसीद घेऊन जावी. यापुढें तुमचा आमचेशीं संबंध राहिला नाहीं. कळावें तारीख १।२।१९०२ इ०

सही

किसन तुळसीराम अज्ञान पा० करणार मातोश्री गंगाबाई जवजे

तुळसीराम तर्फे मुखत्यार

मुज्य इतवा वलद मुरादखा राहणार जळगांव व ता. मजकूर.

## वर्तमानसार

कार्डें, पाकिटें यांचा खपः— गुदस्तसालीं हिंदुस्थानांत दीडकोट रुपयांची पोस्ट कार्डें, पाकिटें व टिकिटें खपलीं. यांपैकीं तेरा कोट साठ लक्ष नुसतीं कार्डें खपलीं.

उभे साधूः—बडोद्यास कोणी गोविंदपुरी बेचरपुरी नावाचे साधू पुरुष आले असून ते नेहमीं उभे असतात. त्यांचें भोजन निद्रा वगैरे विधि उभ्यानें होत असतात.

अजिंक्यपत्र मागत आहेतः– धांवण्याच्या कामांत अजिंक्यपत्र मिळविण्याकरितां मुंबईस एक युरोपियन गृहस्थ आले असून आपल्या बरोबर धांवण्यास कोणी तयार असल्यास यावें अशी त्यांनीं किमेक शहरी पत्रें पाठविलीं आहेत असें समजतें.

मुंबई युनिव्हर्सिटीची वैद्यकीकडील फ्याकलटीची 'डीन' ची पदवी मिळविण्याकरितां डा. रुस्तमजी नसरवानजी खोरी आणि सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर हे उमेदवार पुढें आले आहेत.

कुत्र्याचें विष उतरतें.—अहमदनगर जिल्ह्यांत एक खेडें आहे. त्या खेड्याजवळ जी एक विहीर आहे तींत स्नान करून त्या विहिरीचें पाणी प्यालें असतां पिसाळलेलें कुत्रें चावलें असलें तरी तें विष न बाधतां मनुष्य बरा होता असें ह्मणतात. याचा पक्का शास्त्रीय रीतीनें निर्णय झाला पाहिजे.

रुपये गिळणारा काबुली—सुमारें तीस वर्षांचा एक सशक्त काबुली गेल्या आक्टोबरांत अफगाण सरहद्दीवरून इंग्रजी सरहद्दींत येत होता. त्याजवळ ६९ काबुली रुपये होते. ह्या रुपयावर काबुलच्या अमिरानें शेंकडा तीन टक्केप्रमाणें जकांत ठेवलेली आहे. ती जकांत चुकविण्याकरितां सदर तरूण काबुली जवानानें आपणाजवळील ६९ रुपये गिळण्यास सुरुवात केली जकांत नाक्यावरील शिपायानें झडती घेतांना त्याच्या तोंडांत ६ रुपये सांपडले त्यावर जकांत घेऊन त्यानें त्यास सोडून दिलें पुढें लंडीकोटी येथें पोंहचल्यावर तेथील दवाखान्यांतून त्यानें जुलाबाचें औषध घेतलें, परंतु गिळलेले ५९ रुपये कांहीं जुलाबांत बाहेर आले नाहींत. रुपये पोटांत राहिल्यानें त्याची क्षुधा बंद झाली. पुढें तो पेशावर येथील दवाखान्यांत आला. आणि तेथील डाक्तरास त्यानें आपल्या रोगाचें कारण कळविलें. तेव्हां डाक्तरानें त्याचें पोट चिरून त्यांतील ५९ रुपये बाहेर काढले! हे ५९ रुपये आठ दिवस पर्यंत त्या काबुलीच्या पोटांत होते.

कर्ज फेडून घेण्याची रीतः– सयाममध्यें कर्जदार जर ३ महिन्यांत देणें न देईल तर त्यास सावकार पकडतो व त्याजपासून हवी तितके दिवस नोकरी करून घेतो, फिर्याद करण्यापेक्षां ही रीत किती नामी आहे.

कागदी पायगाड्याः—कागदाच्या चाकांच्या दोन चाकी पायांनीं चालणाऱ्या गाड्या निघाल्या असून त्या हल्लीं सुरू असलेल्या गाड्याहून मजबूत असतात असें समजतें.

कथा करणारी मुलगी—पडवळाचे महाळुंगे या गांवचे राहणारे विठ्ठलबुवा ढोरे या नांवचे माळी आहेत. त्यांची मुलगी सखूमामा ही केवळ ११ वर्षांची असतां आज बरेच दिवस कथा करीत असते. कथेचा थाट ह्मणजे बाप विठ्ठल बोवा तबला अगर मृदंग मागें वाजवितात व एक नातलगीण बाई ताऊस व झांज वाजविते. कीर्तनांत समयोचित गोष्टी सांगून आख्यान वगैरे योग्य रीतीनें सांगते.

एका स्त्रीचा धीटपणा— मंचुरियांतल्या एका रेल्वेवरची पुढील प्रमाणें एक गमतीची गोष्ट प्रसिद्ध झाली आहेः— एका गाडींतून एक मांचु सरदार बसून चालला होता. आपण सरदार आहों या दमावर त्यानें आपल्या डब्यांतल्या दुसऱ्या उतारूंस अगदीं गांगरून सोडलें होतें. सिटामिकर नांवाच्या स्टेशनवर गाडी उभी राहिली असतां कांहीं उपहार करण्याकरतां हे सरदार गाडींतून खालीं उतरले व जातांना त्यानीं आपल्या अनुयायांस बजावून सांगितलें कीं 'जर का कोणी माझ्या जाग्यावर बसला तर खबरदार, मी त्यास ठारच करीन.' हे गृहस्थ डब्याच्या बाहेर गेले असतां त्या डब्यांत एक राशियन स्त्री शिरली व त्या सरदाराच्या जाग्यावर बसली. हें पाहून त्या डब्यांतल्या दुसऱ्या लोकांनीं तिला पुष्कळ सांगितलें पण तिनें तें ऐकलें नाहीं. इतक्यांत तो सरदार गृहस्थ आला व आपल्या जागेवर एक स्त्री बसलेली पाहून त्याला फार चुस्सा आला व त्यानें लागलीच आपली तरवार उपसली. त्या बरोबर ते डब्यांतले भित्रे लोक अगदीं घाबरून गेले पण ती स्त्री मुळींच डगमगली नाहीं. त्याची तरवार पाहिल्या बरोबर त्या स्त्रीनें एक चकचकीत पिस्तुल काढलें— दिवाळींतलें नव्हे– व त्याच्यापुढें धरलें व ह्मणाली, तूं आपली जागा जो कोणी घेईल त्याला ठार मारण्याची धमकी दिली आहेस, अशी अगदीं भित्रे, कमकुवत असे लोक आहों असें समजतोस काय? नंतर आपल्या पायाशेजारच्या जाग्याकडे बोट करून ती ह्मणाली 'हे शूर सरदारा तूं येथें बैस, ती तुझी जागा आहे' हें ऐकून त्या सरदारास लाज वाटली व तो निमूटपणे त्या जाग्यावर बसला. चांगला शेरास सव्वाशेर भेटला ह्मणजे सगळें कांहीं नरमावतें. ही गोष्ट वाचून आमच्या नेभळ्या लोकांच्या अंगीं कांहीं वीरश्री येईल काय?

इंग्लंडांत नेटिव माजिस्त्रेट– मि० नौरोजी दादाभाई अलब्लेस ब्यारिस्टर ऍटलॉ लंडन येथाल जे. पी. व एम्. ए. कुइन्स स्कालर यांना ह्मिमटन पोलिस कोर्टाचे मुख्य जज्ज नेमलें आहे. नौरोजी हे पारशी गृहस्थ असून, पारशी गृहस्थाला इंग्लंडामध्यें मुख्य जज्जाची जागा मिळणें हा पहिलाच प्रसंग आहे.

स्त्री फेलो झालीः– अहमदाबादच्या गुजराथ कालेजचे फेलोच्या जागीं मिसेस विद्यागौरी नांवाचे यंदाच बी. ए. झालेल्या गुजराथी विदुषीला तेथील अधिकाऱ्यांनीं नेमिलें आहे.

---

नोटीस

रा० रा० रावजी वा बाबूजी पाटील राहणार मौजे रोटी पोस्ट–जळम तालुके खामगांव जिल्हा अकोले यांस.

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं गेल्या दुष्काळांत एकंदर रुपये ४०० तुह्मी मला व माझे बापास कर्जाऊ देऊन आमची मालकीची जमीन मौजे हिंगणे दादगांव तालुके खामगांव येथील तीन शेते सर्वे नंबर १।२।१।१९ व मौजे हिंगणें इच्छापूर येथील एक शेत सर्वे नंबर १० अशी चार शेतें सदर्हू कर्जाचे फेडीसाठीं तारण घेतली. त्याचा करार तुमचा आमचा असा झाला कीं ज्या अर्थी रुपये फिटतील अशी तुह्मास दुष्काळामुळें खात्री वाटेना त्या अर्थी चारशे रुपयाचे खरेदीखत आह्मी तुह्मांस सदर्हू शेताबद्दल करून द्यावे व एवसाल पुरते पट्टेखतही लिहून द्यावें. मुद्दल रुपये ४०० व तुह्मास व्याजा ऐवजी उक्ते नफा ह्मणून रुपये ३०० मिळून रुपये ७०० आह्मी तीन वर्षांत द्यावे व रुपये सातशे तुह्मांस पटले ह्मणजे तुमचे आमचे जो खरेदीचा दस्तऐवज आहे त्यांतील शेताचे परत खरेदीखत आमचे नावानें तुह्मी करून द्यावे व जमीन आमचेच कबज्यांत राहावी. फक्त वरपंगी खरेदी व पट्टा तुमचे नांवानें केलेला असावा तुह्मांस फक्त रुपये ७०० घेण्याचा हक्क राहून तीन वर्षांनंतर नफ्या दाखल वाटेल तितकी रकम मागण्याचा अधिकार करारा प्रमाणें ठरला आहे. मात्र तुह्मास सदर्हू शेता संबंधानें इतरास खरेदी गहाण, बक्षीस वगैरे प्रकारचे कोणते ही व्यवहार करण्याचा अधिकार नाहीं. येणें प्रमाणें करार होऊन करारा प्रमाणें मी तुह्मास मुद्दल रुपये ४०० वसूल दिले तेव्हां तुह्मी वरील ४ शेतापैकीं सरवई नंबर १।२।१।१० या तीन शेतांची परत खरेदी माझे ह्मणण्याप्रमाणें सरवई नंबर २१ ची माझे नावची व सरवई नंबर १।१० ची सुकदेव वलद शेवाजीचे नावची करून दिली. आतां फक्त तुह्मास मज जवळून रुपये ३०० घेण्याचा हक्क आहे यापेक्षां कांहींएक नाहीं. हे रुपये ३०० मी तुह्मास देण्यास तयार आहे तरी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत चवथें शेत सर्वे नंबर १९ याची परत खरेदी माझे नावे करून देऊन रकम घ्यावी व मजला पावती द्यावी येणे प्रमाणें न केल्यास तुह्मास अधिक नफा मागण्याचा हक्क राहणार नाहीं. गेल्या आषाढांत सदर्हू सर्वे नंबर १९ मध्यें मी वहीतीस गेलो असतां देवराव रामचंद्र देशमुख वस्ती लाकर खेड तालुके मलकापूर जिल्हे बुलडाणें याने सदर्हू शेताचा कबजा बळजबरीनें मजकडून घतला. त्याचा व तुमचा एक विचार होऊन या बाबतींत कांहीं लबाडीचा व्यवहार झालेला आहे असें मला उडत कळतें. तरी असें रितीनें लबाडी करून दुसऱ्याचें हातानें माझे ताब्यांतील शेतीचा कबजा घेवविणें व माझे नुकसान काढणें हें आपले सारख्यास योग्य नाहीं. तुमचा व आमचा झालेला करार आपण लक्ष्यात आणावा. हें आपलें कृत्य लबाडीचे व विश्वासघाताचे आहे हे सहज दिसून येईल करितां ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत तुमचे नफ्याचे रुपये ३०० आपण चुकते घेऊन मजला पावती द्यावी व सर्वे नंबर १९ चे परत खरेदीखत माझे नांवानें मला करून द्यावें असें करण्यास चुकाल तर तुह्मांवर व देवराव रामचंद्र देशमुख यांवेवर नुकसानी बद्दल व ताब्याबद्दल योग्य इलाज करणे तो तर करीनच. परंतु तुह्मी निवळ विश्वासघात केल्याबद्दल योग्य तो इलाज नक्की करीन. कळावें तारीख २६।१।१९०२ इत्यादि.

सही
बळीराम वलद दर्याजी पाटील
मौजे रहाणार हिंगणे दादगांव
हल्लीं वस्ती मुरंब तालुके
मलकापूर पोस्ट–नांदुरा.

---

नोटीस

वेशमी रतन वलद रामजी सैतवाड वाणी रहाणार नऊळके तालुके आकोट पोस्ट आकोट यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळवितों कीं, माझी मुलगी मार्ये मोनी हिचा विवाह तुमच्याशीं शास्त्रोक्त रीतीनें झाला आहे. त्यास अदमासें ५ वर्षें झालीं. लग्न झाल्यापासून तुह्मी तिला आपलें घरीं मुळींच नेलें नाहीं. गेल्या दोन दुष्काळांत तिचें पोषण मलाच करावें लागलें. तुह्मांस तिला घेऊन जाण्याबद्दल दोन तीन वेळां कळविलें पण तिला नेऊन तिच्याशी संसार करण्याचा तुमचा हेतु दिसत नाहीं. सबब ही नोटीस देणें भाग पडलें. आतां त्या मुलीला तुह्मी घरीं घेऊन जावें व तिच्याशी जनरीति प्रमाणें आनंदानें संसार करावा नाहीं पेक्षां तिला फारकती देऊन मोकळी करावी. शिवाय तिला गेलीं ५ वर्षें मी पोशिले त्याजबद्दलचा खर्च अंदाज रुपये २५० आणून द्यावेत. येणें प्रमाणें ही नोटीस पोचल्यापासून आठ दिवसांचे आंत योग्य निकाल न केल्यास आह्मी हीच नोटीस फारकती समजून तिचा दुसरा गंधर्व लावून टाकू. मग तुमचा तिजवर कोणताहि हक्क राहणार नाहीं. शिवाय तिच्या खावटीच्या खर्चाबद्दल सरकारांत फिर्याद करून सर्व पैसे वसूल केले जातील. व अखेर निकाला पर्यंत लागणारा खर्च तुह्मकडून घेतला जाईल. कळावें तारीख ३० माहे जानेवारी १९०२ इसवी.

सही
सिताराम वलद बापूजी सैतवाड
राहणार शेगांव.

---

नोटीस

रा. रा. अवधूत शिवराम पाटील रहाणार आलेगांव तालुके बाळापूर यांसः–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, आलेगांव येथें आमचे दुकानाचे शेजारी लागून असलेली बखळ जागा तुह्मी खरेदी घेतली असून त्यांत आमच्या मोऱ्यांचें पाणी जाण्याची वहिवाट पूर्वीची आहे. असें असतां तुह्मी त्या जागेत मातीचा भराव वगैरे घालून त्या बंद करण्याचा विचार असल्यामुळें आह्मी चार लोकांस जमा करून तुह्मी असें करू नये असें सांगितलें. परंतु ती गोष्ट तुह्मांस पसंत आली नाहीं करितां तुह्मांस लेखी कळविलें आहे. तुह्मी आमचे पाणी जाण्याची सोय करून वाटेल तें करावें. तसे न केल्यास योग्य त्या तजवीजी कराव्या लागतील व खर्च विनाकारण तुमचेवर बसेल. कळावें. तारीख १६।१।१९०२ इ.

सही
'रामासा हरिलालसा' दुकानचे
वहिवाटदार त्रिंबकसा द. खु.

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ..........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ८६
दुसरे खेपेस .... .... ....८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ................ 8 as
Single copy ................................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line... 3 as

VOL XXXVI — AKOLA MONDAY 10 FEBRUARY 1902 — NO 6

वर्ष ३६ — आकोला सोमवार तारीख १० माहे फेब्रुवारी सन १९०२ इ० — अंक ६

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तें दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नावानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.


मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

## खरेदीकरा !

### रास्कोपची थेट व खरीं पेटेंट वाचेस नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्य प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकास ह्मणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणाची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्याबद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचना:—पुढें नमुना २१ लाईनचें मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे, मध्यम १६ व. १७ व. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

| | |
|---|---|
| १९ लाईन ओपनफेस | ४० |
| १९ „ हंटिंग | ५० |

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

| | |
|---|---|
| १८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे | १५० |
| १९ „ हंटिंग, नकशीचे | २५० |

**मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.**

| | |
|---|---|
| रास्कोप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग | १८ |
| १९ „ सेकंद कांट्यासह | २० |
| १९ „ मध्यभागी सेकंद काटा असलेलें | २२ |
| १९ „ हाफ् हंटिंगचें | २० |
| १९ „ हंटिंगचें | २० |
| १४ „ रिस्ट वॉच | २० |

**इनुगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें**

| | |
|---|---|
| १९ लाईन ओपन फेस | २० |
| १९ „ हंटिंग | २० |
| १४ „ रिस्टवॉच | २० |

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

| | |
|---|---|
| १४ लाईन रिस्ट वॉच | ३० |
| १४ „ हंटिंग | ३५ |
| १८ व १९ „ ओपनफेस | ३० |
| १९ „ सेकंद कांट्यासह | ३२ |
| १९ „ मध्यभागी सेकंद काटा असलेलें | ३५ |
| १९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें | ३५ |
| १९ „ हंटिंग | ४९ |

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

सी. हीनीगर आणि कंपनी.
ओरिजिनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

## भारत भाग्योदय अथवा सोन्याचा दिवस

नं. ८

सायंकाळचा समय होता. शिपाई लोक सिंहगड किल्याच्या आतल्या बाजूस व्यवस्थ करीत होते. कांहीं शिपाई बाहेरून नुक्तच दमून थकून आल्यामुळें तेही आंत जाऊन आपल्या पुढील तजविजीस लागले होते. हा सर्व प्रकार इतक्या गुपचीप रीतीनें चालला होता कीं त्याची माहिती बाहेरच्या लोकांस मुळींच होत नव्हती.

किल्यातील एका उंच माचीवर किल्याचे अधिकारी आपल्या थोड्याशा लवाजम्या निशीं आसमंतीक रमणीय प्रदेशाची शोभा अवलोकन करीत होते. पुर्वेकडील भागांतील दऱ्यांतून वाहणारी निरा नदी आपल्या पांढऱ्या शुभ्र पाण्यानें फारच रमणीय दिसत होती. उत्तरेकडील भागांत धान्यांचीं शेतें हिरवीं गार अशी दिसत होतीं. या उंच माचीवरून फार लांब अंतरावर पुणें शहर दिसत होतें. दक्षिणेकडील बाजूला उंच उंच पर्वतांच्या रांगा एका खालीं एक दिसत होत्या. अशा प्रकारच्या अत्यंत रमणीय देखाव्याची शोभा व मौज पाहाण्याकडे त्या किल्याच्या लष्करी अधिकाऱ्यांचें लक्ष लागून राहिलें होतें. पण त्या वन शोभे बरोबर त्यांच्या मनांत दुसऱ्या नाना तऱ्हेच्या कल्पना येत असाव्यात असें काणासही दिसलें होतें.

लढाईची शेवटची वेळ ह्मणजे एन आणीबाणीच्या प्रसंगाचा समय होय. अशा प्रसंगाच्या जयापजयावर एखाद्या घराण्याचें, प्रांताचें, व राष्ट्राचें सर्वस्व जीवीत अवलंबून असतें. ह्यावेळीं शूर शूर ह्मणून नांवजलेल्या लोकांचा देखील थरकाप होऊन जातो. तीच वेळ ती होती. मोगलाच्या सैन्या समवेत आलेल्या षाहिस्तेखान सरदाराचा जय होतो, किंवा मराठ्यांची बेडी खटकन तुटून पडून वैभवसूर्याचीं किरणें क्षितिजावर चमकूं लागतात, हाच त्यावेळेस फार महत्वाचा विषय असून सिंहगड किल्यांतील त्या रणशूर मऱ्हाठ्याच्या मनात घोळत होता. या संबंधानें त्यांपैकीं एकामेकामध्यें वाटाघाट चालली होती. असें दिसत नव्हते तरी त्या सर्वांच्या त्या वेळच्या चेहऱ्या वरून या गोष्टीची सत्यता कोणाच्याही नजरेस स्पष्ट आली असती. सिंहगड किल्यांत त्यावेळीं शिवाजी महाराजा बरोबर फक्त कापते २५ सच लोक होते. व एवढ्याच्या लोकानिशीं सिंहगडास वेढा घालणाऱ्या मोंगल सैन्याची दाणादाण उडविण्याचा शिवाजी महाराजांचा विचार होता. या सिंहगडच्या वेढ्यांत येणाऱ्या जयापजयावरच महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याची सर्व मदार अवलंबून होती. हें कोणासही सांगावयास नको. अशा वेळीं वर सांगितलेले विचार शिवाजी महाराजांच्या मनांत घोळत असल्यास त्यांत नवल तें काय?

वरील मंडळींत मोरोजी त्रिमल पेशवेही हजर होते. मोरोजी लहानपणापासून शाहाजीच्या हाता खालीं लढाईच्या कामगिरीवर असत. व यांनीं शिवाजीला प्रख्यात प्रतापगडचा किल्ला मिळवून देण्यांत अवर्णनीय मदत केली होती. यांना पेशवाईचीं वस्त्रें मिळून फक्त ४ च वर्षें झालीं होतीं. परंतु तेवढ्याच अवकाशांत त्यांनीं फारच उत्तम तऱ्हेची बुद्धिमत्ता प्रगट केली. अफझुलखानाला ठार मारल्यानंतर यांनीच त्याच्या सैन्याची आपल्या थोड्याशा सैन्यानिशीं दाणादाण उडविली. दिल्लीच्या बादशहा बरोबर ज्यावेळीं लढाई चालू होती त्या वेळीं याच मोरोजीला शिवाजीनें सेनापती नेमलें होतें. लढाईत शूर, अडचणींत धिमा आणि हुषार, भाषणांत चतुर आणि राजधोरणी, अशा प्रकारचा हा मोरोजी शिवाजीचा अत्युत्तम जिवलग स्नेही होता.

मोरोजी प्रमाणेंच अण्णाजी सोनदेव हाही एक शिवाजीचा जिवलग दोस्त होता. तोही सर्व कामांत पूर्ण वाकबगार होता. यानें शिवाजी साठीं इ. स. १६४८ त कल्याणचा किल्ला आणि त्याच्या भोवतालचा मुलुख काबीज केला होता. आणि यानेंच या वेळीं रायगडचा प्रसिद्ध किल्ला बांधण्यास सुरवात केली होती या वेळीं मराठ्यांच्या स्वारांचा सुभेदार नेटाजी पालकर हा तेथें नव्हता. नेटाजी पालकरानें मोंगलाच्या छातीवर पाय देऊन त्यांच्या भर सैन्यांतून पळत जाऊन अहमदनगर आणि औरंगाबाद यां मधील मुलुख किती हुषारीनें काबीज केला होता याची सर्व हकीगत मोंगलाकडील सरदारांच्या लढाईच्या दरबारांत चांदखानानें सांगितलेलीच आहे. सिंहगडच्या बचावासाठीं या वेळीं जी पलटण होती त्याचें सेनापतीत्व या वेळीं कडताजी गुज्जर याजकडे होतें. तसेंच मराठ्यांच्या इतिहासांत किंबहूना हिंदुस्थानच्या इतिहासांत शूरत्वाविषयीं प्रसिद्धीस आलेले येसाजी कंक, तानाजी मालुसरे हे या वेळीं शिवाजी बरोबरच होते. बाजी फसलकर मात्र आपली कामगिरी बजावून आपल्या स्नेहांस दुःखार्णवांत लोटून, मराठी राज्याची भक्कम पायावर उभारत चाललेली इमारत पाहाण्यास न राहतां हा मृत्य लोक सोडून चालता झाला!!! हरहर! उजवा हात गळून पडल्या प्रमाणेंच बाजी फसलकराचें स्मरण सर्वांस यावेळीं होऊन सर्वांचा अश्रुपात व्हावा यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. असो.

हलके हलके काळोख पडत चालला. ठरलेल्या कामगिरीची काय व्यवस्था करावयाची या विषयीं सर्वांचा विचार चालू झाला. अंगांत चिलखत घालून हातांत जंबीया, तरवार घेऊन शिवाजी सज्ज झाले.

शिवाजी— आतां सर्व तयारी आहे, आतां मला जाण्याला परवानगी मिळावी.

मोरोपंत— आह्मां पैकीं कोणालाही बरोबर न्यावयाचे नाहीं असा आपला मानस दिसतो. आह्माला घेतल्या शिवाय आपण कोठेंही गेला नाहीं, मग अशा भयंकर वेळीं

आह्मांला अवश्य घेतलें पाहिजे.

शिवाजी– पेशवे, असें कधींही होणार नाहीं. तुह्माला वाटत असेल तर तुह्मी खुशाल या. भवानीच्या प्रसादानें मी आज अशी शपथ घेतली आहे कीं आज लढाईत जय तरी मिळवीन नाहीं तर या देहाची आशा सोडून धारातीर्थी प्राण देईन. या साठीं मला जय मिळेल असा तुह्मी मला आपला आशीर्वाद द्या. आपणा सर्वांवर मराठी राज्याची मदार अवलंबून आहे. आपण सर्व जण जर एकदम धारातीर्थी पतन पावलों, तर मागच्या लोकांची स्थिती काय होईल? या साठीं कदाचित मी नाहींसा झालोंच तर तुह्मी तरी बाकीच्यांना धीर देण्यास असावें ह्मणून मी तुह्मास नेण्या विषयीं कांकूं करित आहे. माझ्या पश्चात हिंदु धर्माचा सांभाळ तुह्मीच करणार आहांत. तुमच्या शिवाय त्यांला कोणीही नाहीं. ह्या साठीं मला परवानगी मिळावी. माझ्या वडिला प्रमाणेंच मी तुह्माला समजतों या साठीं मला जाण्याची परवानगी द्यावी.

( पुढें चालूं )

---

## वऱ्हाडसमाचार

---

मिती माघ शुद्ध २ शके १८२३

---

## सार्वजनिक सण.

यंदा सणांच्या सुटी संबंधानें मोठा फेरफार करण्यांत आला आहे. ख्रिस्ती सणा पैकीं ईस्टरचे व नाताळाचे सण सर्व जातींच्या लोकांस देण्या विषयीं हुकूम झाला आहे. तसेंच हिंदूचे जे सणवार होते तेही सार्वजनिक सुट्यांमध्यें पूर्वी प्रमाणेंच कायम ठेविले. राजकर्त्यांनीं आपले सण सार्वजनिक केले या बद्दल आमच्या मनाला संतोषच वाटतो. पण ही सुधारणा अगदीं एक पक्षीय झाली आहे. आमच्या मतानें मुसलमान बंधूंच्या सणा विषयीं, अशी समदृष्टी सरकारानें दाखवावयाला पाहिजे होती. इंग्रजी मध्यें निदान हा भेदाभेद चांगला नाहीं. एक पक्षीं ख्रिस्ती सण सार्वजनिक सुटीचे दिवस केले नसते तरी हरकत नव्हती. ख्रिस्ती धर्माच्या सणांमध्यें इतर नेटीव लोक फारसे मिसळत नाहींत आणि या कारणामुळें त्या सणांच्या दिवशीं सरकारी कार्यमालेला रजा नसती तरी फारशी कटकट पडली नसती. इतकीं वर्षें ख्रिस्ती सणांची सुटी नव्हती आणि तिच्या अभावा मुळें मोठीशी अडचण कोठेंच आली नाहीं. परंतु मुसलमानांच्या सणा विषयींची गोष्ट निराळी आहे. हिंदूचा व मुसलमानांचा एक जीव होत चालला आहे आणि परस्पर लोक एकमेकांच्या सणांचे दिवशीं एकत्र मिळतात आणि आपल्या आनंदोत्सवानें परस्परांस आनंद देत असतात. तेव्हां वस्तुस्थिती प्रमाणें आणि सामान्य जनसमुदायाच्या गरजे प्रमाणें महमदी सण ह्मणजे सार्वजनिक सुटीचे दिवस असावयाला पाहिजे होते. जी गोष्ट अगोदर पाहिजे होती ती देण्याविषयीं सरकारची कृपादृष्टी चागलीशी वळली नाहीं. ख्रिस्ती सणांची सुटी मात्र अवश्य देण्यांत आली. हा प्रकार राज्यकर्त्यांच्या मर्जीचा मामला होय.

ख्रिस्ती सणांला प्रमुखत्व देण्यांत आलें ही गोष्ट द्दभुसत्तेची होय. त्या संबंधानें कोणाचाही हो ना नाहीं. परंतु ही गोष्ट करितांना सरकारानें हिंदूंच्या सणाविषयीं अव्हेरबुद्धि प्रदर्शित केली आहे हें पाहून मोठा खेद वाटतो. हिंदूंच्या सणाविषयीं असा अनादराचा प्रकार व्हावयाला नको होता. शिमग्याची सुटी एक दिवस कमी केली, दिवाळी सारख्या मोठ्या सणाच्या दिवसा संबंधानें छाटाछाट करण्यात आली. तशीच गेल्या रेसिडेन्सी मध्यें महालक्ष्मीची सुटी बंद करण्यांत आली अशाविषयीं मुद्दाम हुकूम फर्मावला आहे. महालक्ष्मीची सुटी दीड महिन्यापूर्वीं प्रकाशित केल्यानंतर बुद्धिपुरस्सर ती कमी करण्यांत आली. हा प्रकार पुष्कळसा खोडसाळपणाचा दिसतो. आमच्या वऱ्हाड प्रांतांत महालक्ष्मीचा सण फार मोठा आहे. घरोघर मोठमोठे उत्सव होत असतात. अशा आनंदाच्या दिवशीं सरकारानें आपल्या कचेऱ्यांस सुटी देऊं नये ही गोष्ट सरकाराच्या थोरपणाला शोभत नाहीं. सुटी देणें ही गोष्ट सरकारच्या खुषीची आहे. पण या खुषीची वाटणी करितांना सरकारानें मुसलमानांच्या सणाविषयीं भेदाभेद व्यक्त करावा, हिंदूंच्या सणाविषयीं अनादराचा भाव दाखवावा आणि आपल्याच सणाचे दिवे ओवाळावेत ही गोष्ट कोणाही सूज्ञ पुरुषांस पसंत पडणार नाहीं आणि आमच्या राज्यकर्त्यांस तर अगदींच शोभणार नाहीं.

---

## शीतज्वर

शीतज्वरा संबंधानें अलिकडे नवीन शोध पुष्कळ लागले आहेत. या शोधांची माहिती सर्जन मेजर रेली साहेब यांच्या अध्यक्षते खालीं डाक्टर वासुदेव रामचंद्र भट यांनीं गेल्या सोमवारीं येथील टाऊनहालांत दिली. व्याख्याते आणि अध्यक्ष या उभयतांनीं सांप्रतच्या शोधाची दिशा दाखवून दिली आणि या दिशेनें तापाचे प्रतिहारक उपायही कळविले. वैद्यकाचा हा विषय असल्या मुळें त्या संबंधाची तपशीलवार माहिती सामान्य लोकांस फारशी लागत नाहीं ह्मणून आह्मी त्याच धोरणानें मुख्य मुद्यांच्या व अत्यंत उपयोगाच्या गोष्टी खालीं देत आहों.

डाक्टर वासुदेवराव भट यांचा परिचय आह्मी करून दिलेलाच आहे. हे रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांचे जामात आहेत आणि या आप्तसंबंधा मुळेंच या गृहस्थांचा लाभ आमच्या शहरास घडत आहे. हे विलायतला जाऊन राहिले आणि वैद्यकाच्या विषयांत पारंगत होऊन ते परत आले आहेत. यांनीं आरोग्य शास्त्रासंबंधानें विलायतच्या जाडी परीक्षा दिल्या आहेत. यांनीं आपल्या व्याख्यानांत विषयाची जी माहिती दिली ती ऐकून सर्जन मेजर रेली साहेब यांनीं त्यांचा गौरव केला आणि डाक्टर भट यांच्या व्याख्यानातील एका भागाची संपूर्णता करून दिली. डाक्टर रेली साहेब यांनीं असा पुढाकार घेऊन आरोग्यरक्षणाविषयीं लोकांस चार बोधाच्या गोष्टी सांगण्याचा मोठा लाभ दिला या बद्दल ते स्तुतीला पात्र आहेत. डाक्टर रेली साहेब हे फार जुने अधिकारी आहेत हे मोठे विद्वान असून डाक्टरींत प्रवीण आहेत असा त्यांचा लौकिक आहे. परंतु लोकांस त्यांच्या गुणांचा आमोद सहसा मिळत नाहीं. त्यांची फी मोठी आहे व त्या मुळें सुखवस्तु लोकांनाही त्यांचा फायदा करून घेतां येत नाहीं, तेव्हां सामान्य लोकांची गोष्ट बोलण्याची गरजच नाहीं त्या शिवाय लोकही औषधोपचारा संबंधानें त्यांच्याकडे जाण्याला भितात. हा धंदा असा असतो कीं धनलाभा पेक्षां यशलाभाकडे नजर आधिक दिली पाहिजे; तशांत सरकारी पगार ज्यास मोठा मिळतो त्यांनीं निदान पात्रापात्र पाहून आपल्या उत्कृष्ठ विद्येचा फायदा फुकट दिला पाहिजे. असो. आरोग्यदानाची थोरवी फार मोठी आहे. तेव्हां तत्संबंधी माहिती देण्याचे परिश्रम डाक्टर भट व डाक्टर रेली यांनीं घतले हो आनंदाची गोष्ट होय.

शीतज्वरा संबंधानें पूर्वीं कल्पना अशी होती कीं हवेंतील दोषिक वायू श्वासोच्छ्वासाच्या मार्गानें शरीरांत गेल्यामुळें हा रोग उद्भवतो. पण ती समज चुकीचा ठला असून नवीन शोध असा लागला आहे कीं मच्छर आपल्या बारिक सुयांनीं या तापाचें बीज माणसाच्या रक्तांत उत्पन्न करितात. गेल्या नाताळाच्या सुटींत या मच्छरा संबंधानें नागपुरास एक सरकारी कमिशन भरलें होतें आणि त्यांत मोठमोठ्या डाक्टरांनीं आपल्या अनुभवानें वरील शोध निश्चित केला आहे. मच्छर हा कृमि सर्वांच्या माहितींतला आहे. हा हवेंत माशी प्रमाणें उडतो. याच्या उत्पत्तीचीं स्थळें ह्मटलीं ह्मणजे पाणी सुकलेल्या घाणीच्या जागा, घाणेरड्या पाण्याचे डाहरे, जनावरांचे गोठे व तशाच ओलीच्या, अस्वच्छ व केरकचरा सांचलेल्या जागा हीं होत. येथें तेथील घाणी मुळें मच्छर उत्पन्न होतात. याच्या मध्येंही स्त्री पुरुष असे भेद असतात. यांच्या खुणा सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साह्यानें डाक्टर भट यांनीं स्पष्टपणें सांगितल्या. स्त्री जातीच्या मच्छराला सुयी सारखे बारीक पाय दिसतात. पुढील बाजूला दोन पायाचे पुढील पंजे दिसतात. पुल्लिंगाच्या मच्छराची आकृती माशाच्या आकृती सारखी असून याच्या पंजाला व पायाला किंचित् पिसाच्या सारखा भास होतो. मच्छराचे अनेक भेद आहेत. ते भेद कळविण्यासाठीं निरनिराळ्या जातीचे मच्छर डाक्टर भट यांनीं बाटल्यांतून धरून आणिले होते. आपल्या ढोबळ दृष्टीलाही थोड्याशा परिचयानें हे मच्छर निरनिराळे ओळखून काढतां येतील. या मच्छरांमध्यें कांहीं प्रकारच मच्छर निरुपद्रवी असतात, आपण ज्याला डास ह्मणतो आणि जे आपल्या नावा प्रमाणें शरीराचे लचके घेतात ते मच्छर फार उपद्रवी असतात. हेच मच्छर शरीरांतील रक्त दूषित करितात आणि त्या रक्तदोषामुळें हें चालतें बोलतें यंत्र शीतज्वराच्या तडाख्यांत सांपडतें.

डास, मच्छर इत्यादि फार त्रासदायक असतात तेव्हा आपोआपच मनुष्य त्यांचा संहार करण्याला प्रवृत्त असतो. परंतु वरील विवेचना वरून ही गोष्ट ध्यानांत येईल कीं, शीतज्वराची उपाधी ज्या ठिकाणीं फार प्रसृत होते तेथें आपण अगोदर मच्छरांचा संहार करण्याच्या खटपटीला लागलें पाहिजे शीतज्वर व मच्छर यांच्या परस्पर उत्पत्ति स्थितीची गोष्ट पक्की ध्यानांत धरली पाहिजे. डाक्टर रेली साहेब तर असें ह्मणाले कीं पटकी, देवी गोंवर इत्यादि आजारांनीं जितके लोक मरतात त्या पेक्षां शीतज्वरानें अधिक लोक मरतात. शेवटील मरणाचें प्रमाण एकंदर मृत्यूच्या संख्येशीं शेंकडा ६०।७० इतकें मोठें येईल. एकंदरीनें मच्छर हा प्राणी क्षुद्र खरा पण तो महा उपद्व्यापी दिसतो. किंबहुना मृत्यूच्या दरबारातील तो श्रेष्ट प्रधानापैकीं बलाढ्य प्रधान दिसतो.

मच्छाराचा संहार करण्याचे उपाय डाक्टर भट यांनीं कांहीं सांगितले ते मुख्यत्वें करून लक्ष्यांत धरण्या सारखे आहेत. या उपायांचा प्रयोग त्यांनीं बाटलींत धरलेल्या मच्छरावर करून दाखविला. मच्छराचें आणि मातीच्या तेलाचें मोठें वांकडें आहे. हें राकेल तेल टाकलें तर त्याला प्राणरक्षक आक्सीजन वायु मिळत नाहीं आणि तो ताबडतोब मरण पावतो. जेथें घाणेरड्या पाण्याचीं डबकीं असतील तेथें या तेलाचा उपयोग अवश्य करण्यास चुकूं नये. हा उपाय अगदीं सोपा असून घरोघर करून पाहण्या सारखा आहे. दुसरा उपाय धुराचा होय. विडीचा धूर बाटलींत सोडल्या बरोबर मच्छर पटापट मरूं लागतात. ज्या खोलींत मच्छर असतील त्या खोलींत आपल्या विडी ओढणाऱ्या मित्रमंडळीकडून विड्याचें इंजिन चालूं करावें आणि सर्व दारें बंद करावीं ह्मणजे पुष्कळसे मच्छर नाहींसे होतील. तात्पर्य एवढेंच कीं घरांत मच्छर व डांस झाले ह्मणजे घराचीं दारें बंद करून गवऱ्यांचा धूर करावा आणि ऊद गंधक, डांबर वगैरे पदार्थ जाळले तर हवा स्वच्छ होऊन मच्छर ही मरतील. वरील होमहवन केल्या पासूनही अशा प्रकारचा फायदा होण्या सारखा आहे. होमहवनाचा हा लौकिकी फायदा सुधारकांनीं विसरूं नये. अंगाला चंदनादि तेलें लावल्या पासून मच्छराचा उपद्रव कमी होतो, आणि तेलाचा उपाय फारसा संहारकारक नसून सामान्यपणें प्रतिबंधक आहे. चवथा उपाय आमच्या वाचण्यात आला तो रंगा संबंधानें आहे. कांहीं रंग मच्छराला विशेष आवडतात आणि कांहीं रंग त्याला अगदीं सहन होत नाहींत. जांभळा, निळा, काळा, अस्मानी इत्यादि रंगांला मच्छर फार जलदी लुब्ध होतो आणि त्या रंगाचा पदार्थ मिळाला ह्मणजे तो त्याला अगदीं चिकटून राहतो. यातिश्या त्यात हे रंग दाट मातीची खुळणारे असले तर मच्छराची अतो

सुप्रसन्नता दिसून येते. वरील रंगाच्या उलट स्थिति बाकीच्या रंगावर्धानें आहे. लाल भडक तांबड्या पेक्षां गुलाबी फिक्का रंग असेल तर मच्छर कमी गोळा होतील. पिंवळा सोनेरी रंग त्यापेक्षां बरा, त्याहूनही पिंवळीचा पांढुरका पिंवळा बरा. हिरवा रंग अधिक पसंत आहे. सर्व रंगांत पांढरा रंग मच्छराला मोठा अपायकारक असतो, यावरूनच मच्छरदानीला कपडा मुद्दाम पांढरा घेतात. चकचकीत पाढऱ्या पेक्षा गौरवर्ण पांढुरका रंग विशेष चांगला असा अनुभव आहे. ही रंगाची फोड ध्यानांत धरली तर घराला चुन्याचा शुभ्र रंग द्यावा, हिरवी पिंवळी खाकी मळकट रंगाची लकेर असली तरी हरकत नाहीं. या रंगविवरणावरून वस्तुमात्राच्या उपयोगाचें धोरण कसें ठेवावें हें समजण्या सारखें आहे. पांढरा पोषाख नेहमीं पसंत करितात त्यालाही वरील विवरण सयुक्तिक दिसतें. मच्छरा पासून जो रक्तदोष होतो तो दूर करण्याला क्विनीनच्या पाढऱ्या भुकटीचा उपाय अवश्य करावा. पांच ग्रेनाची एक पुडी पोस्ट आफिसांत दिडकीला मिळते. ती घेतली असतां रक्तदोष दूर होतो आणि भावी शीतज्वराचा प्रतिकार होतो. आमचे पाहण्यांत असेंही आहे कीं या पुडीचा उपयोग आठवड्यांतून एकदोनदां केला तरी तो बलवर्धक पौष्टिक औषधी सारखा फलद्रूप होतो. या लेखापासून ज्या गोष्टी वेण्यासारख्या आहेत त्या लोकांनीं घरोघर अमलांत आणाव्या ह्मणून आह्मी त्या तपशिलानें सांगितल्या आहेत. जे कोणी गृहस्थ वरील उपायाचा अनुभव घेतील आणि आपल्या अनुभवाचा लाभ सर्व लोकांस देण्याची कृपा या पत्राचे द्वारानें करितील तर आह्मी आमच्या वाचकांचे विशेष आभारी होऊं.

---

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 10 1902

---

### MAHAR'S BHIKA

The Mahar's Bhika is a relic of ancient times. It is sometimes called the Mahar's Hakka. It siguifies the privileges to which a Mahar is entitled from his position in the village community. These privileges are by way of remuneration for the office he holds in the village. He performs certain duties in the interest of his village. As the lowest component of the Hindu community his duties are more or less of a menial nature. He works under the direction of his village officers and it is his business to preserve the sanitation of the village, to remove the dead cattle therein, and to act as a watchman of the village. Besides he has to see that the crops in the fields attached to his village are not cut or damaged by any people from out—side. Mahar's Bhika is then the Vatan of a Mahar for the work he does. His right is to realize a certain proportion of crops or its money—value over the total acerage under cultivation. This proportion is now a fixed amount of corn for each acre under cultivation. This right he gets from every holder of a survey number. This right is admitted from time immemorial. It is as old as a hoary village system itself. It is an item of that system. It has, however, survived the disruption of the village polity. The Mahar's Bhika still continues where as the old communal arrangements have ceased to exist. The Government have substituted in new system in its stead. It is, however, based on the lines of the village system of a very long standing. The new arrangement preserves in tact the village dignitories. Their services are retained in a modified form and for their remuneration as village officials, they are allowed a certain percentage over the revenue—collections of their respective villages. The office of a Patil or a Patwari is like that of a regular servant of the Government but the office continues in the family as a hereditary vatan. But this is not the position of a vatandar Mahar. His office is hereditary and the members of his family work by rotation. But his services continue no longer as a charge on the imperial revenue. He is paid in specie or in coin by each holder of the land in his village. A ryot is to pay him his annual wages as regularly as he has to pay his land—revenue. If one fails to give his village—Mahar his dues the government swoop upon him like a tiger and he is forced to pay his quota of the Mahar's Bhika. Under the new system the Mahar discharges menial duties to the government, and assists them in their collection of the revenue but at the time of his payment he is referred to the ryots of his village. The government is thus a task—master where as the ryot is a pay—master. It is an anomaly in the present arrangements that in the matter of remunerating the Vatandar Mahar all burden is shifted to the shoulders of the ryot. The Mahar's Bhika looks like a compromise which confers all rights on the government without their corresponding liabilities. We do not grudge a Mahar whatever is due to him for his services but the only question is as to who is pay for them. In its present form it is like an adjunct of the land—revenue. It should be classed among the local cesses that are collected along the land—revenue. It does not, however, rise or fall along with the changes in the figures in the land—revenue. This is so because is is paid in specie according to a fixed rate. We would object in all earnestness to the payment of the Mahar's Hakka by a ryot. The objection is based on a principle. The government have increased their land—tax because they ehink that the land yields better crops than in previous years and the general rise in prices brings more money into the pockets of the people. We have in these columns shown that the present increase in the land revenue is not justifiable in view of the deterioration of the soil, the growing poverty of the people and the effects of the last two famines. In spite of all prayers of the people the government elected to increase the land—tax. It is the work of the royal privilege but in doing so the government proves to be a bad landlord. But it is no use to speak further on this matter. It is equally noteworthy that along with the increase in the land—revenue there comes a larger pressure of local cesses also. When the amounts of the land—tax and loal cesses have thus grown to enormous figures we think that the people will be withing their right to pray to the Government to dis-continue the Mahar's Hakka as a burden on the people. The circumstances are such as necessitate the proper consideration of the proposal we have made to the local government. It is not a matter to be looked at without concern and we hope that the government will give the subject a careful consideration.

---

### वऱ्हाड

हवामान— गार वारा फार सुटतो. थंडी कडक पडते. हवेंत एकदम फरक झाल्यामुळें किरकोळ दुखणीं वाढलीं आहेत. रोगराई कांहीं नाहीं. बाजारभाव तेजीचे आहेत.

मि० एच. गाडविन आस्टीन हे रजेवरून परत येऊन वाशिमास डेपुटी कमिशनरच्या जागीं रुजूं झाले.

आणि तेथील डेपुटी कमिशनर मि० एफ. डब्ल्यू. ए. प्रीडा साहेब हे तीन महिन्यांची हक्काची रजा व तिला जोडूनच ९ महिन्यांची आजारीपणाची रजा मिळून १२ महिन्यांच्या रजेवर गेले. त्यांच्या सन्मानार्थ वाशिमकरांनीं गेल्या शुक्रवारीं पानसुपारीचा मोठा समारंभ केला होता.

मि० मारिस यांनीं यवतमाळास जाऊन डेपुटी कमिशनरीचा चार्ज घेतल्यावरून मि० सिम्सन हे इलिचपुरास डेपुटी कमिशनराच्या जागीं रुजूं होण्यासाठीं गेले. आणि क्याप्टन हार्सिवरो हे रजेवर जाणार आहेत.

उमरावतीचे सिव्हिल सर्जन मेजर राबर्ट ब्राडले रो. साहेब यांस लेफटनंट कर्नलच्या हुद्याची बढती विलायत सरकाराकडून देण्यात आली आहे.

बाळापूर तालुक्यांतील मळसूर येथें आणि पुसद तालुक्यांतील धनोडा येथें माघ पौर्णिमे पासून भरणारी जत्रा प्लेगाच्या भितीमुळें बंद करण्यांत आली.

गेल्या नोवेंबर महिन्यांत १२९६९ माणसें जन्मलीं व ८६९० मरण पावलीं. जननाची संख्या फार वाढली आहे.

**महोदय पर्व**—हें फार मोठें होतें. गेल्या शनिवारीं या पर्वणी निमित्त हिंदु लोकांची यात्रा मोठी होती. पूर्णा नदीच्या काठीच्या मुख्य मुख्य स्थळीं हिंदु लोकांच्या झुंडी चालल्या होत्या. रेलवेंत जागा नव्हती शेकडो बैलगाड्या एक सारख्या चालूं होत्या आणि स्पेशल गाडीही काढण्यांत आली होती.

तारीख ५ आणि ६ रोजीं पटवारी लोकाची सर्व्हेची परीक्षा झाली. ४४ उमेदवारांपैकीं २० पसार झाले.

पटवारी लोकांस सर्व्हे काम शिकविण्याबद्दल काढलेला वर्ग येत्या जून पर्यंत बंद करण्यांत आला आहे.

मे. कुमार श्री हरभामजी, दिपुटी कमिशनर हे काल रोजीं किरकोळ रजेवरून परत आले. त्यांचा मुक्काम ता० १० व ११ रोजीं निमकर्दी व ता० १२ रोजीं हातरुण येथें होऊन ते परत येतील.

---

### नोटीस

तीर्थरूप रा. रा. रामचंद्र शिवबक्ष मारवाडी रहाणार शेरी हल्लीं मुक्काम तेल्हारा तालुके आकोट यांस:—

मला आपल्याला नोटीस देणें भाग पडलें आहे कीं, आपल्या हातून इस्टेटीची व्यवस्था नीट लागत नाहीं, इतकेंच नाहीं तर पुष्कळशी इस्टेट आज तागाईत नाहीशीहि झाली. दुकानदाराचा असा उलटा व्यवहार चालला आहे. आतां यापुढें इस्टेटीचें जतन आपल्या हातून होईलसें मला वाटत नाहीं. तुह्मी लोकांच्या सांगण्यानें वागता ह्मणून ही बुडणूक होत आहे. सर्व स्थावर जंगम इस्टेट तमची स्वतांची मिळकत नसून सर्व वडिलार्जित मिळकत आहे. या इस्टेटींतील निदान माझा हिस्सा तरी तुह्मी विकूं नये. इस्टेटीची अफरातफर होत असल्यामुळें माझी मोठी नुकसान होत आणि ह्मणूनच मी या लेखानें तुह्मांस कळवितो कीं, तुह्मी माझा हिस्सा माझे ताब्यांत द्यावा. आणि या नंतर तुमच्या वाट्यास आलेल्या हिश्याची मनसोक्त व्यवस्था लावावी. ही नोटीस पोचल्यापासून १५ दिवसांचे आंत अशी व्यवस्था तुह्मी पंच मार्फत न कराल तर दिवाणी कोर्टांतून मला दाद मागावी लागेल व त्याचा सर्व खर्च तुह्मावर पडेल. तुह्माला या उपर जिनगी विकण्यासंबंधानें किंवा गहाण ठेवण्यासंबंधानें किंवा इतर व्यवहारानें तिजवर एखादा बोजा बसविण्यासंबंधानें या लेखानें तुह्मांस मनाई केली आहे. कळावें तारीख ९ माहे फेब्रुवारी सन १९०२ इसवी.

सही

जयगोपाळ रामचंद्र राहणार सेरी

दस्तुर खुद्द.

---

### जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, आमचे तीर्थरूप रा. रा. रामचंद्र शिवबक्ष यांची स्वकष्टार्जित मिळकत कोणाचीच नाहीं. त्यांच्यापाजवळ जी स्थावर जंगम जिनगी आहे ती सर्व वडिलोपार्जित आहे. माझ्या लेखी संमती शिवाय त्या इस्टेटी संबंधानें देवघेवीचा कोणताही व्यवहार करूं नये अशी मी त्यास मनाई केली आहे. जर या उपर कोणी त्यांच्याशी स्थावर जंगम इस्टेटी संबंधानें व्यवहार करील तर त्याचा बोजा इस्टेटीवर न पडतां त्याची जबाबदारी त्याच्याच शिरावर राहील. माझी लेखी संमती घेतल्या शिवाय इस्टेटी संबंधानं कोणचेहि कोणी देवघेव करूं नये. कळावें तारीख ९ फेब्रुवारी सन १९०२ इ.

सही.

जयगोपाळ रामचंद्र रहाणार शेरी ता० आकोट.

NOTICE

Under rule 12 of the Municipal Election rules, it is hereby published for general information that the election to fill up the vacancies caused by the retirement of the members in the Akola Municipal Committee under operation of rule 31 of the said rules, will take place, from 7 A. M. to 5 P. M. on the 26th, 27th and 28th February 1902. The following table gives for each ward the names of the out—going members, the date, and place of election, the name of the Polling Officer and the dates before which nomination papers under rule 13 of the Municipal Rules shall have to be delivered to this Polling Officer.

Dated Akola 6th February 1902 — Vishnu M. Mahajani, Vice—Chairman, Municipal Committee Akola.

| Ward | Names of out-going members | Date of election | Place of election | Name of the Polling Officer | Dates before which nomination papers should be delivered | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| I | Mr. Keshav Govid Damle. " Hanumant Raoji | 26th. February 1902 | Patel's Chowri | V. N. Dandekar Esq. Extra Assistant Commissioner | 19th. February 1902. | |
| II | " Tayab Noor Kachhi. " R. N. Deshpande. " Mohamadally Anwarally. | 27th. February 1902 | Grain Market Office | | 20th. February 1902. | |
| III | " B. N. Mudholkar. | 28th. February 1902 | Town Hall | | 21th. February 1902. | |

Dated Akola
6th. February 1902

Vishnu M. Mahajani
Vice-Chairman M. C. Akola.

## जाहिरात

मुनिसीपाल निवडणुकीचे नियमातील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोले मुनसिपाल कामटीतील ज्या मेंबरांच्या जागा सदहू नियमा प्रमाणें नियम ३१ अन्वयें खाली होतील त्या भरण्याकरितां ता. २६।२७।२८ माहे फेब्रुवारी सन १९०२ इसवी. रोजीं सकाळचे ७ वाजल्या पासून सायंकाळचे ५ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे. खालीं लिहिलेल्या तक्त्यांत वार्डांपैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें, त्या वार्डा करितां होणारे निवडणुकीची तारीख, जागा, पोलींग आफिसरचें नांव, उमेदवार यांनीं कोणत्या तारखे पर्यंत पोलिंग आफिसरकडे मुनिसिपाल नियम १३ अन्वयें आपले अर्ज द्यावत वगैरे माहिती दिली आहे. ता. ६।२।०२

V. M. Mahajani
Vice Chairman
M. Committee Akola.

| वार्ड नं. | निघणार मेंबरांचीं नांवें. | निवडणुकीची तारीख | निवडणुकीची जागा | पोलिंग आफिसरचें नांव. | उमेदवारांनीं कोणत्या तारखेचे आंत नांवचे कागद द्यावयाचे |
|---|---|---|---|---|---|
| १ | मि. केशव गोविंद दामले. मि. हनुमंत रावजी खानझोडे | २६.२.०२ " | पाटील चावडी | मि. विश्वनाथ नारायण दांडेकर | १९.२.०२ " |
| २ | मि. तयबनुर कच्छी मि. रामचंद्र नारायण देशपांडे मि. महमद अल्ली अनवरअल्ली | २७.२.०२ " " | ग्रेनमार्केट आफिस | | २०.२.०२ " |
| ३ | मि. बळवंत नरसिंव्ह मुधोळकर | २८.२.०२ | टाऊनहाल | | २१.२.०२ |

Akola
6—2—1902

Vishnu M. Mahajani
Vice Chairman
Municipal Committee Akola.

नोटीस

रा. रा. रावोजी गंभीरजी यादगिरे या नांवचें दुकान पेठ बाळापूर यांचे मालक देवजी वल्लद राघोजी यादगिरे राहणार पेठ बाळापूर व विठोबा वल्लद भगवान यादगिरे राहणार पेठ बाळापूर. यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे दुकानीं माझें खातें बरेंच दिवसापासून चालू आहे. त्याचा हरहमेश हिशेब करून मी तुमचे वहीवर रुजू करून टिकीट लावून सही करून देत आलों. येणे प्रमाणें इसवी सन १८९५—१८९६—१८९७ व १९०० इसवी ह्या प्रत्येक सालीं मी तुमचे दुकानचे वहीवर रुजू करून देत गेलों. त्या त्या मित्तीस करून दिलेले रुजू प्रमाणें मजकडे बाकी राहत गेली. रुजू शिवाय दुसरी बाकी मजला तुमची देणे नव्हती. इसवी सन १९०० सालीं तारीख १२ जानेवारी रोजीं मी तुमचे वहीवर जी रुजू करून दिली ती रुपये ११९४८— ची आहे. त्यास व्याज दरमहा दर शेकडा ८९ आणे प्रमाणें ठरलेले आहे. या बाकींत मी तुह्मास तारीख २८—१—१९०२ इसवी रोजीं रुपये १००० एक हजार वसूल दिला व त्याबद्दलची पावती रिती प्रमाणें तुमचे दोघांचे सहीची मागितली असतां व तिचा मसूदा मी तुह्मास लिहून दिला असतां त्या प्रमाणें पावती लिहून न देतां तुह्मी आपण होऊन इच्छेस येईल त्या प्रमाणें पावतींत मजकूर लिहून तारीख ३०—१—१९०२ रोजीं तुह्मापैकीं विठोबा भगवान याचे एकट्याचेच सहीची मजला आणून दिली. तींत लिहिलेला मजकूर वाचून पाहतां तुह्मी आमचे कडेस ६९९ रुपये बाकी काढता व ती तीन किस्तीनें द्यावयाची, देण्याचा करारही त्यांत लिहितां. सदहू पावतींत लिहिलेला मजकूर अगदीं खोटा असून निवळ आमचेवर पोकळ बाकी काढण्याचा तुमचा विचार दिसत आहे. तुमचे आमचे दरम्यान कर्जाऊ देवघेवीनें व्यवहार दस्तऐवजी व तिकीट लावून रुजू करून झालेले आहेत त्या सर्वांचे हिशेब वर लिहिलेले रुजूंत आले आहेत. करितां तारीख १२—१—१९०० रोजीं ११९४८— पेक्षां अधीक रकम कोणत्याही तऱ्हेनें मी तुह्मास देणेदार नाहीं. तुमचा आमचा शराकतींत असलेला निराळा व्यवहार त्याचा हिशेब होणे आहे. व त्या बाबतींत तुमचे आमचे जे देणें घेणे आहे त्याचा ह्याशी संबंध नाहीं. माझे तरोडे तालुके खामगांव येथील शेत सरवई नंबर १०९ संबंधानें तुमचे व माझे ठरलेले करारा प्रमाणें तुमचेकडून वर्तन होण्याची जबाबदारी तुमचेवर आहेच. ह्या सर्व गोष्टीचा तुह्मी विचार करावा. मजकडे तुमचे काहीं एक घेणे निघत नसून उलट तुह्मी पावतींत रुपये ६९९ बाकी काढता हे तुमचें करणें अगदीं गैर आहे व या उपर तुह्मी मजवर खाते बाकीवरून अगर दस्तऐवजावरून रकम मागितल्यास अगर त्याजबद्दल दिवाणी प्रकार केल्यास तो सर्व रद्द आहे. व त्याजबद्दल तुह्मी जबाबदार राहाल. मजला फिरून खर्चांत पाडल्यास तो मी तुमचे जवळून घेईन. कळावें तारीख ६-२-१९०२ इसवी.

सही
लक्ष्मण रामचंद्र पाटील कुळकर्णी
राहणार मांडव बुजरूक
तालुके बाळापूर दस्तुर खुद्द.

नोटीस

बेशमी बापूराव वल्लद बळिराम आणि गोविंदराव वल्लद कृष्णाजी काळे राहणार पहापळ परगणे व ता० केळापूर नि० वणी व तुकाराम नामाजी दलाल राहणार सावर परगणें राणी उमरावती ता० यवतमाळ जि० वणी यांस.

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे वासरी परगणे व तालुके केळापूर हा गांव तुमचे आणि आमचे तक्सिमीत असून तुह्मी दुसरे गांवीं राहतां, व मी मौजे मजकुरीं राहत असून गांवची एकंदर सर्व वहिवाट करितों. ह्मणज वायदा वसूल, खर्चवेच वगैरे सर्व करण्याचें काम मजकडे आहे तर सन १९०१।१९०२ फसली सन १३११ सालचा हिशेब देणें आहे. सबब तुह्मी मौजे मजकुरी येऊन हिशेब करून तुमची रकम जी कांहीं निघेल ती तुह्मी घ्यावी व आमची निघाल्यास आह्मास द्यावी. या करितां नोटिशीनें तुह्मास जाहीर केले आहे. तरी नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत येऊन सर मजकूरचा हिशेब समजून घ्यावा. तसे न केल्यास पुढें तुमची कोणत्याच प्रकारची तकरार न ऐकतां फिर्याद वगैरे केल्यास कोर्ट खर्च किंवा व्याज वगैरे आह्मी देणार नाहीं हें आपणास कळावें. ता० २६।१।१९०२ इ.

सही
जैराम विठोबा पाटील कुळमुखत्यार मौजे वासरी.

नोटीस

बेशमी लक्ष्मण वल्लद गुनाजी कुडांडे राहणार मौजे सराटी परगणे वई तालुके केळापूर जिल्हे वणी यासी नोटीस देणार झांबरी मर्द लक्ष्मण कुडांडे राहणार मौजे टाकली चिद्राबन परगणे व तालुके केळापूर जिल्हे वणी सुमारसन १३११ फसली कारणे नोटीस देण्यात येते कीं मजला ऋतुप्राप्त होऊन दोन वर्षें झालीं तरी तुह्मी जनरिती प्रमाणें संसार करीतच नाहीं. मी कसा तरी कालक्षेप केला पण या पुढें मला माझा जन्म व्यर्थ घालवावयाचा नाहीं तर तुह्मी आज पासून पंधरा दिवसाचे आंत येऊन रिती प्रमाणें सोड मोकळिक देऊन लेखी फारकत द्यावी ह्मणजे मी जातीधर्मा प्रमाणें पुनर्विवाह करून घेईन. जर करितां वरील मुदतीत तुमचे कडून वर लिहिले प्रमाणें न घडून आल्यास मी तुमची कांहीं तकरार न ऐकता दुसरा नवरा करून घेइन यांत अंतर पडणार नाहीं करिता या नोटिशीनें तुह्मास कळविलें आहे आतां मजवर कसलीहि जबाबदारी राहिली नाहीं. ही नोटीस लिहून दिली तारीख ३।२।०२

दस्तुर— दिगांबर दत्तात्रये देशपांडे
दस्तुर खुद्द.

सही
सहीची निशाणी बांगडी झांबरी
मर्द लक्ष्मण हिची असे
दस्तुर खुद्द.

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

वर्षाची आगाऊ ५ हाशील ०१२
सहामाही " ३ " ०८
साल अखेर " ७ " १ ०८
किरकोळ अंकास ..........................०६

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........०१ ०६
दुसरे खेपेस .... ........०१

Annual in arrears 7 " 1 ...
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ................................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line... 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 17 FEBRUARY 1902 NO 7

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १७ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ० अंक ७

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची

### बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नावानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेव ठेल्या रकमेवर दरसाल दर शेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.


मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

### खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरीं पेटेंट वाचेस नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हें वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्य प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्याबद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनचें मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे, मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ " हंटिंग.......................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ " हंटिंग, नकशीचे ...........२५०

**मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ " सेंकंद कांट्यासह...........२०
१९ " मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................२२
१९ " हाफ हंटिंगचें................२०
१९ " हंटिंगचें ....................२०
१४ " रिस्ट वॉच ...................२०

**इनॅमलमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ऑपन फेस ............२०
१९ " हंटिंग.......................२०
१४ " रिस्टवॉच....................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ " हंटिंग........................३५
१८ व १९ " ऑपनफेस............३०
१९ " सेकंद कांट्यासह ............३२
१९ " मध्यभागीं सेंकंद काटा असलेलें ................३५
१९ " ऑपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ " हंटिंग ...................... ४९

लेडिज वॉचेस १४. १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हीनीगर आणि कंपनी, ओरिजिनल निनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट. ५ हार्नबी रोड, मुंबई.

### जाहिरनामा

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं श्रीशंभू महादेव शिखर सिंगणापूर तालुके माण जिल्हा सातारा येथें दरसाल चैत्र मासीं यात्रा भरत असते त्या प्रमाणें चालूं सालीं चैत्र शुद्ध ५ शके १८२४ ते चैत्र शुद्ध १५ शके मजकूर पावेतो ह्मणजे तारीख १३ माहे एप्रिल सन १९०२ रोज रविवार पासून तारीख २२ माहे एप्रिल सन १९०२ रोज मंगळवार पावेतो दोन्ही दिवस धरून भरणार आहे करिता ज्या लोकांस यात्रेस येण्याचे असेल त्यानीं यावे कळावें तारीख ९ माहे फेब्रुवारी सन १९०२.

S. H. Tagare.
मामलेदार व्हाईसप्रेसिडेंट.

---

### नोटीस

नोटीस लिहून देणार बालू वल्लद पूर्णाजी खरप मोख तालुके बाळापूर याजकडून गोवर्धनदास परशराम मारवाडी दुकान नागद तालुके बाळापूर यांस कळविण्यांत येतें कीं मौजे नागद तालुके बाळापूर येथील शेत तुमचे नांवें असून सदर्हू शेत तुह्मी सोनाजी वल्लद परशराम अडनाव कटांगे वस्ती नागद यांस रुपये ३०० स अजमास सात आठ वर्षें झालीं असेल विकत दिलें. आणि सदर्हू शेत सोनाजीचे ताब्यांत दिले असून सदर्हू रुपयाची फेड सोनाजी यांनीं केली आणि बाकी रुपये बिंदाई मर्दे सोनाजी इनें फेड केली असून राहिलेले शिलक रुपये १०० चा हवाला मी असे करारानें घेतला कीं सदर्हू शेताची विक्रीखत माझे नांवानें करून देऊन शेत ताब्यांत द्यावे. नंतर हवाल्याची रकम देईन त्या करारा प्रमाणें सदर्हू शेताची विक्री करून देण्यास ह्मटलें असतां व शेत नावें करून देण्याचे असता तुह्मी करून देत नाहीं. यावरून व ह्या नोटिसीचे तारखे पासून आठ दिवसाचे आंत विक्री आपल्या शेताबद्दलची करावी न केल्यास हवाल्याची रकम मी बिलकूल देणार नाहीं. सदर्हू हवाला व्यर्थ आहे. माझी असलेली सही रद्द समजावी. कळावें ता. ५।२।१९०२ इ० मुकाम आकोलें.

सही
बालू वल्लद पुर्णाजी खरप मोंद
तालुके बाळापूर निशाणी खुद्द.

---

### नोटीस

(१) गोदूबाई जवजे जीवबा सोनार व (२) कृष्णाबाई जवजे जीवबा सोनार उभयतां राहणार आकोला यांसः—

या लेखानें कळविण्यांत येतें कीं जीवबा दादा मयत झाल्या नंतर तुह्मी वांटणी संबंधानें जो मजवर हुकूमनामा मिळविला आहे तो हुकूमनामा मला पुत्र नामें भगवंता झाल्या कारणानें रद्द झाला; आणि इस्टेटीचा वारसा जीवबाच्या मरणा नंतर व सदर्हू हुकूमनाम्यानंतर त्यांच्या मुलाकडे आला आणि त्या मुलाच्या मरणा नंतर मी जन्मदाती मातोश्री या नात्यानें सर्व इस्टटीची मालकीण आहे तुह्मा उभयतां साठीं अन्नवस्त्राची नेमणूक मी करून देण्यास तयार आहे ही नोटीस पोंचल्या तारखेपासून आठ दिवसाचे आंत सर्व इस्टेट हिशोबासुद्धां स्वाधीन करावी आणि अन्नवस्त्राची नेमणूक दरमहाची दर महा घेत जावी असें तुह्मी उभयतां न करा-ल तर कोर्ट मार्फत दावा करून सर्व खर्चा सुद्धां इस्टेट ताब्यांत घेतली जाईल. कोर्ट खर्चाची रक्कम तुमच्या अन्नावस्त्राच्या हक्का तून कमी केली जाईल. कळावें. तारीख १२ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ०

सही
सिताबाई मर्दे जीवबा सोनार.
निशाणी बागडी.

---

### नोटीस

बेशमी लाधुराम बालकिसनदास गांधी राहणार आकोट यासः—

मी खालीं सही करणार अशी नोटीस देतो कीं, आकोट येथील गणेशदास कन्हयालाल जिनींग कंपनी यांत माझा हिस्सा ¼ चार आण्याचा होता तो तुह्मांस तारीख ११ जानेवारी सन १९०२ ईसवी रोजीं फरोक्त केला. आतां माझ्या हिश्या संबंधानें मी कोणाच्याहि देण घेण्यांत नाहीं जिनांतील वह्यामध्यें माझे हिश्यावर जी कांहीं बाकी निघेल तिजबद्दल मजवर जबाबदारी उरली नाहीं, सर्वस्वी नफा तोटा तुमचा झाला आहे. पूर्वीच्या जिनिंग मधील माझें नांव ह्मणजे कन्हयालाल होतें तें आतां काढून टाकावें. सदर्हु जिनांतील माझ्या खात्यावर योग्य हिशोबानें जें देणें व घेणें निघेल त्यावर माझी मालकी आहे. कळावें तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ.

सही मारवाडींत
हिरालाल कन्हयालाल भंडारी दस्तुर
कन्हयालाल. राहणार आकोट.

---

### जाहिरात

सर्व लोकांस या लेखानें असें जाहीर केले जातें कीं कसबे आकोट येथें गणेशदास कन्हयालाल या नांवची जिनिंग फाक्टरी आहे. त्या फाक्टरींत माझा हिस्सा चार आण्याचा होता तो मी तारीख ११ जानेवारी १९०२ इ. रोजीं लाधूराम बालकिसनदास यास विकला. आतां माझ्या हिश्या संबंधानें गणशदास कन्हयालाल या नांवावर जें देणें घेणें असेल तें लाधूराम बालकिसन यानपाशीं मागावें. यापुढें गणेशदास कन्हयालाल या नांवावर कोणी देणघेण करूं नये. केल्यास त्या बदल मी कोणचेहि प्रकारें जबाबदार नाहीं. कळावें तारीख ११ माहे फेब्रुवारी १९०२ इ.

सही मारवाडींत
हिरालाल कन्हयालाल भंडारी दस्तुर
कन्हयालाल राहणार आकोट,

कि० दिवाणी दावा नंबर १ क्लास २१ १९०१

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सरटिफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब बहादुर सिव्हिल जड्ज अकोला यांचे कोर्टात.

अर्जदार– आत्माराम सिताराम वस्ती अकोले

या नोटिशीनें सर्वांस कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार याने मयत चंद्रभागाबाई जवजे सिताराम हिचे आकोला येथें सेव्हिंग ब्यांकेंत रकम रुपये २२९२८१ जमा आहेत. व खामगांव सेव्हिंग ब्यांकेंत मयत सिताराम माणकेश्वर याचे रुपये ७००१ जमा आहेत, असे एकंदर कर्ज वसूल करण्याकरितां सरटिफिकीट मिळावे म्हणून तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १९०२ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व त्या अर्जाचे चौकशीची तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १९०२ इसवी रोजीं मुकरर केली आहे. तर सदर्हू दिवशीं १० वाजतां तुम्ही आपले दस्ताऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टात अर्जदार याजला कां सरटिफीकीट देऊं नये याचें कारण दाखविण्याकरितां हजर व्हावें. माझे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख १९ माहे फेब्रुवारी सन १९०२

V. N. Dandekar
Civil Judge.

---

नोटीस

बेशमी सोनाबाई मर्द हनुमान कलाल राहणार बारशी टाकळी. तालुका आकोला यांस:—

या नोटिशीनें कळवितो कीं तुम्ही शुद्धवऱ्हाडी पत्रांतून दिलेली नोटीस खोटी आहे. तुमच्या नवऱ्या कडून खरेदी घेतलेलीं दोन्ही शेतें १ आक्टोबर १९०० पासून माझ्याच ताब्यांत आहेत. ही खरेदी कायमची आहे. मुद्दल रुपये ४०० चारशे व तिहोत्रा प्रमाणें व्याज मिळून सर्व रक्कम खरेदीच्या तारखे पासून सहा महिन्यांच्या आंत आणून दिली असती तर तुमच्या शेतांची परत खरेदी तुम्हाला द्यावी असा माझ्या मनांतून विचार होता. परंतु मयत हनुमान यानें किंवा त्याच्या साठीं दुसऱ्या कोणी रकम दिली नाहीं इतकेंच नाहीं तर खरेदी परत मला नको असें हनुमान मला म्हणाला व त्या साठींच मी त्याला त्याच्या दुखण्यांत १७२ रुपये उसनवार दिले आहेत. ही रक्कम सव्याज तुम्ही आणून द्यावी व तसें करण्याला तुम्हाला मुदत आठ दिवसांची दिली आहे.

दोन्ही शेतें परत खरेदी देण्याला मी जबाबदार नाहीं. मी शेतें परत खरेदी देतही नाहीं. तुम्ही मला १९४ रुपये दिले नाहींत. १९४ रुपयांची गोष्ट अगदींच बनावटी आहे. तुम्ही वाटेल तर आपल्या पापाचा निवाडा कोर्टात करून घ्यावा. आकोल्याच्या सावकाराकडे तुम्ही रकम ठेविली असेल ती परत घेऊन जावी. मी ती रकम घेणार नाहीं. या नोटिशीचा खर्च व तसेंच खोटी फिर्यादआर्यादि कराल तर त्याचा ही खर्च तुम्हावर पडेल. कळावें. तारीख १६ फेब्रुवारी १९०२ इसवी.

सही ( उर्दूत )
सय्यद इब्राहिम वल्लद सय्यद अब्रू दस्तुर खुद. राहणार बारशीटाकळी.

---

नोटीस

बेशमी मेघराज गंगाराम मारवाडी या नांवचें दुकान अडगांव बुजरुक दुकानचे मालक हेमराज व सुरजमल या उभयतांस:–

नोटीस देणार विठू आप्पा वल्लद शंकर आप्पा वाणी रहाणार अडगांव बुजरुक.

नोटीस देतो कीं, माझा बाप शंकरआप्पा यांनीं तुमचे दुकानावर कर्ज घेऊन अडगांव येथील माझी धाब्याची दुकान लांब नऊ ९ पुढें मोहटी कवेलूची व वर माडी कवेलूची ही दुकान जागा इमलवासुद्धां, रुपयांस व्याज नाहीं, व जागेस भाडें नाहीं अशा शर्तीनें तारणगहाण टेविली आहे त्यास तुम्ही आपले तारणगहाणाचे रुपये घेऊन ती जागा, नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत खालीं करून द्यावी. येणे प्रमाणें मुदतीत न केल्यास कोर्ट मार्फत जागा ताब्यात घेतली जाईल व सर्व खर्च ह्या नोटिशीच्या खर्चासह तुम्हापासून भरून घेतला जाईल. कळावें तारीख १९ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ.

सहीची निशाणी
विठू आप्पा वल्लद शंकर आप्पा वाणी रहाणार अडगांव याचे हातची असे. तागडी.

---

नोटीस

बेशमी चंद्रभान वल्लद माधोजी भगत राहणार पिंपरी खुर्द परगणे अडगांव ता० आकोट यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमच्या वडिलापासून आम्ही खरेदी घेतलेलें घर व कोठा दरसाल रुपये २ प्रमाणें भाड्यानें २० जुलै १८८१ पासून तुमच्या ताब्यांत आहे. तर त्या घराच्या व कोठ्याच्या गेल्या सहा वर्षाबद्दल भाड्याची रक्कम रुपये १२ आमच्या दुकानीं आणून पोचती करावी आणि यापुढें आमच्या मनांतून तुम्हाकडे तें घर व कोठा ठेवावयाचा नाहीं तर तुम्ही ही नोटीस पोचले तारखे पासून आठ दिवसाच्या आंत घर व कोठा आमच्या स्वाधीन करावा व भाड्याची रकम चुकती करावी. तसें न केल्यास कोर्ट मार्फत ताबा घेतला जाऊन सर्व खर्चासह भाडें वसूल करण्यांत येईल. कळावें. तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ०

सही
काशीनाथ शंकरआप्पा वाणी दुकान अडगांव. दस्तुर नारायणराव गुमास्ते.

---

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध ९ शके १८२३

---

## दुष्काळ व सारा

हा देश सर्वथैव शेतीवर अवलंबून आहे. शेती पिकली नाहीं म्हणजे या देशाची अवस्था मोठी संकटमय होते आणि तिच्या शिवाय निभाव लागण्याला लोकापाशीं दुसरीं कांहीं साधनें नाहींत. इतर देशांत दुष्काळ पडला तरी इतर उद्योगधंदे लोकांस अन्न-पाण्या वाचून मरूं देत नाहींत. इंडियाची स्थिती दुष्काळांत कशी होते याचें चित्र अद्याप डोळ्यापुढेंच आहे. पाऊस पडला नाहीं तर दुष्काळ पडतो हें सर्वांस कळें; पावसाची गोष्ट माणसाच्या हातची नाहीं या बद्दलही वाद नाहीं. भावी दुष्काळाचें खडतर स्वरूप कमी करण्याचा प्रतिबंधक उपाय कोणता एवढाच प्रश्न विचार करण्यासारखा आहे दुष्काळासारखी आपदा ईश्वर धाडतो पण त्या आपदेंतून आपल्या आप्तमित्रांसह पार पडण्याला उपाय एकच दिसतो कीं पूर्वें ठेवा जवळ पाहिजे. लोकाच्या संग्रहीं धनधान्याचा सांठा पाहिजे; म्हणजे त्याच्या मदतीनें दुष्काळापासून निभाव लागतो. इंडियात हा सांठा लोकांजवळ नाहीं आणि सरकारापाशीं देखील ही धनसंपदा पुष्कळशी जमलेली नसते. सरकारी खर्चाचे दरवाजे मोठे रुंद असून सदा खुले आहेत आणि यामुळें रयतेपासून गोळा केलेला पैसा वरील दरवाज्यांनीं विलायतेला जातो किंवा देशांतच खर्चला जातो. भावी दुष्काळाचा प्रतिकार सरकाराच्या हातून उत्कृष्ठ होण्या इतका धनसंचय नसतो. सरकारी व्यवस्था गेल्या दुष्काळांत चांगली होती तरी कर्जावरच सर्व व्यवस्था झाली. कर्ज म्हणज कायमचा पंगूपणा होय; आणि हा पंगूपणा सतत वाढत्या कलावर असतो. कर्जानें पूर्वपळाची सुस्थिती उत्तर पळाला कमी कमी होत जाते आणि त्यामुळें पंगूपणा गणित श्रेढीनें वाढत जातो.

अशा स्थितींत लोक धनसंपन्न असावेत हें फार जरूरीचें आहे. लोक दरिद्री आहेत. त्यांची धनदौलत शेतीच्या माथीं असते. तेव्हा शेतीमध्यें कांहीं आधेक फायदा राहण्यासाठीं सरकारी सारा कमी व्हावयाला पाहिजे. साऱ्याची रक्कम मोठी असल्यामुळें लोकांस शेती पासून म्हणण्या सारखी किफायत राहत नाहीं व धनसंचयही होत नाहीं. या गोष्टी सरकारापुढें मांडून लोक-प्रतिनिधी म्हणतात कीं दुष्काळच्या प्रतिबंधार्थ तरी सरकारानें आपला सारा कमी करावा. हा अभिप्राय लोकपक्षाचा झाला. सरकारी पक्षाचा अभिप्राय याहून निराळा आहे, हा मतभेद मोठ्या महत्वाचा आहे. लोकपक्षाचा अभिप्राय राष्ट्रीय सभेनें वर्षानुवर्षे सप्रमाण प्रतिपादित केला आहे. इंडिया सारख्या उद्योगहीन देशांत शेतीच्य च द्वारानें लोकांस सवलती पाहिजेत. उद्योगहीनता वाढत गेल्यामुळें आपदांची लांबण दूरवर गेली आहे. अशा स्थितींत साऱ्याची रक्कम कमी होण्या एवजीं वाढत आह ही दुर्दैवाची गोष्ट होय. दळणवळणाच्या सोयी वाढल्या मुळें, शेतीच्या मालाचा बाजारभाव तेजीचे येऊं लागल्यामुळें आणि शेतीचा विस्तार व सुधारणा झाल्यामुळें अथशास्त्रदृष्ट्या साऱ्याची वाढ यथायोग्य वाटत असल; परंतु हा स्युक्तिकपणा इंग्लंडसारख्याच देशाला लागू पडेल. निरोगी प्रकृतीला पौष्टिक आरोग्यवर्धक होईल परंतु रोग जडलेल्या प्रकृतीला पौष्टिक विकृती करितें हें विसरतां कामा नये. ज्या ढोबळ अर्थशास्त्रानें साऱ्याची वाढ संमत ठरते तेंच अर्थशास्त्र विचाराच्या आरशींतून कळावतें कीं इंडियाच्या विपन्नवस्थेला साऱ्याची वाढ निषिद्ध आहे एकपक्षीय अर्थशास्त्र लावीत गेल्यामुळें सरकाराचा दुसरा डोळा मिटला गेला आहे. व अर्थशास्त्रांतील ही चूक अर्थशास्त्रच दाखवीत आहे.

---

## नवी ईति

ईति म्हणजे ईश्वरी शोभाचें लक्षण होय. हल्लींची ईति उंदिराच्या द्वारानें उद्भवली आहे. ईश्वर रागावला म्हणजे आपदा हजार वाटांनीं येऊन उभ्या राहतात भयंकर दुष्काळातून आमचा प्रांत नुकतांच बाहेर पडत आहे तोंच उंदीर आपला प्रळय मांडीत आहेत. आमच्या प्रांतात उंदीर पुष्कळ झाले आहत. हे उंदीर मोठ अनर्थकारक आहेत. हे मोठमोठ्या घुशी एवढे झाले आहेत. शेतातन व घरांतून यांचा सारखा चळवळाट झाला आहे. उंदीर हा क्षुद्र प्राणी वाटतो पण तेच एकत्र झाले म्हणजे ते किती अनर्थ उत्पन्न करितात याची कल्पना आमच्या प्रांतातील लोकांस चांगली होत आहे. शेतात सर्वत्र बिळेंच बिळें दृष्टीस पडतात. रात्र झाली कीं यांच्या झुंडीच्या झुंडी बाहेर पडतात. उभीं पिकें खाऊन फस्त करितात. शेवटील दोन तीन तोड्यांचा कापूस उंदिरानीं लोकांच्या हातीं लागू दिला नाहीं. रब्बीच्या उत्पन्नाला तर उंदिरांचा उपद्रव फार मोठा झाला. रब्बीचें पीक रुपयांतील चार आणेही लोकांस मिळण्याचा संभव नाहीं. बारा आण्या पासून चौदा आणे पर्यंत या नुकसानीचा अंदाजा आहे. पहिल्या खरिपाच्या पिकाला इतका उपद्रव झाला असतां तर दुष्काळ पडल्या शिवाय राहिला नसता. या उंदिरांच्या उपद्रवाचा अंदाजा सरकाराला बरोबर झाला नाही असा आमचा ग्रह आहे. आतां वायदा वसूल करण्यासाठीं गावोगाव पाटील पांड्यांनीं बैठक पसरली आहे. अशा वेळीं वस्तुस्थितीचें खरें दर्शन सरकाराला अवश्य पाहिजे आहे. सरकारी सारा वसूल होईल यांत आम्हाला काडीमात्र शंका नाहीं. लोक सरकारी सारा अगोदर देतात आणि नंतर पोटाच्या सोयी पाहतात. नवी ईति उद्भवली आहे या अर्थी सरकारानें दिलदार बनलें पाहिजे. सरकारी सारा अलिकडेच वाढला आहे आणि तितक्या वर्षांत दोन दुष्काळ झाले व आतां उंदिरांनीं निम्मशिम्मा दुष्काळच आणिला आहे. अशा स्थितीकडे सरकारानें कानाडोळा करूं नये. ही स्थिती पूर्णपणें लक्ष्यात घेऊन लोकांचा क्षेमसमाचार सरकारनें घेतला पाहिजे. रयतेच्या आपदा त्या सरकारच्याच आपदा होत. रयतेला सुख नाहीं व त्याची धान्यसंपदा उंदिरांनीं लयास नेली तरी यांच्या कडून सारावसूल होतोच या गोष्टींचा भावार्थ निरा-

लाभ दिसतो. रयतेच्या दुःखाचें परिमार्जन सरकारानें योग्य वेळीं केलें तर त्या पासून सरकारी कृपेचा लाभ बहुगुणित होतो. सरकारानें नव्या जमाबंदीचा सारा वसूल करूं नये. जुना सारा सरकारी कार्यमालेला पुरेसा होते तेव्हां प्रजाधेनूचें दोहन रक्त निघे पर्यंत होऊं नये अशी आमची सरकारापाशीं विनंती आहे. उंदिरामुळें जी नुकसानी होत आहे ती प्रथमतः आह्माला थोडी वाटली. पण वस्तुतः ही हानी फार मोठी आहे गांवोगांव पाहणी करा ह्मणजे उंदिरामुळें डुबला नाहीं असा शेतकरी विरळाच आढळेल.

उंदिरांनीं शेतींतील पीक जसें खाऊन टाकलें तसाच घरांवरहि त्यांचा उपद्रव मोठा मांडला आहे. धान्य नीट राहत नाहीं; ते कागद पत्र खातात. दौतींतील शाई पितात आणि उंदीर करीत नाहींत अशी कोणतीच गोष्ट नाहीं. हे उंदीर मोठाले असतात त्यामुळें मांजर व कुत्रा हींहि त्यांस काहीं करूं शकत नाहीत उंदिर धरण्यासाठीं सांपळाल वावा तर दोन चार दिवसांत ते सांपळ्या जवळ येईनासे होतात. उंदीर हा प्राणी मोठा धूर्तही दिसतो. वानरा प्रमाणें ते झाडावर चढतात आणि बाभळीचा पालाही खाऊन पार करितात.

आंब्याच्या झाडास यंदा मोहोर फार चांगला घनदाट आला आहे पण हे नवे उंदीर झाडावर चढून त्याचा फडशा उडवितात. एक एक झाडावर पंचवीस पंचवीस किंवा तीस तीस उंदीर चांगले दृष्टीस पडतात. रानांत जनावरें फिरतांना जे पोहटे टाकतात ते देखील उंदीर तसेंच वाळूं देत नाहींत, व त्यामुळें यंदा रानशेणींचा पुरवठाही फार कमी झाला आहे. उंदिरांचीं बिळें पाहिलीं ह्मणजे त्यांची कुशलता व कारागिरी दृष्टीस पडते. बिळ लांबलचक नागमोडीचें असतें. बिळांत धान्याचें कोठार स्वतंत्र असतें व त्यांचा बसण्या उठण्याचा भाग निराळाच असतो. कधीं कधीं या बिळांत नागही जाऊन राहतात. अशा नाना गोष्टी उंदिरांच्या दिनचर्येपासून शिकण्यासारख्या आहेत.

वरील उपद्रवा शिवाय उंदिरा पासून दुसऱ्या एका उपद्रवाची मोठी भिती वाटते. उंदीर प्लेगाचा रोग आणितात असा सार्वत्रिक समज आहे. निदान या रोगानें उंदीर अगोदर मरतात आणि त्यांच्या मरणानें मरणाची पाळी माणसावरही सारखीच झपाट्यानें येते. ही ईति मनुष्याच्या हातून टळणारी नाहीं. एक परमेश्वरच तिच्या पासून निभाव करण्यास समर्थ आहे.

उंदिराचा प्रतिकार करण्याला उपाय जितके उपलब्ध असतात तितके प्रसृत करण्याची जरूरी फार आहे. हे प्रतिकार आह्मास माहित नाहींत परंतु आमच्या कांहीं मित्रांच्या अनुभवावरून आह्मी असें सुचवितों कीं हरताळ व गंधक हे दोन पदार्थ एकत्र घरोघर जाळावे ह्मणजे त्याच्या धुरानें उंदीर नाहींतसे होतात-हा धूर त्यांना सहन होत नाहीं. तसाच दुसरा एक उपाय पुण्या मुंबईकडील पत्रकार कळवितात कीं, ओलें डांबर घरांत जाळावें ह्मणजे उंदीर तें घर सोडून देतात. हा उपाय [illegible] करून पाहिला. डांबर जाळल्यानें हवा स्वच्छ होते पण उंदीर कमीच होतात असें कांहीं पक्केपणीं सांगवत नाहीं या संबंधानें आमचे नेटीव वैद्य व इंग्रजी डाक्टर कांहीं अनुभविक प्रयोग लोकांस कळवितील तर त्याच्या हातून मोठीच लोकसेवा घडेल.

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 17 1902

The British rule is a novel experiment in India. It is humane in character and benevolent in its administration. The blessings of the foreign rule have brought about a many sided development of the country. The country is being exploited to its full extent and in spite of all the advantages which the people of India enjoy, the lion's share in the riches of India devolves upon the English people. The class of rulers have secured all possible resources where as the natives of the country have lost all counts in the competition that has come upon India without its accompanying stimulus to the growth of commerce and Industry. From this point of view all branches of administration work excellently well and bring to the Government an ever increasing source of revenues. The land revenue-system is one of such branches. The Government of India find it to be the most workable system under the present circumstances. They claim the privilege of having established the most perfect system. It is said to be lenient in its incidence, moderate in its enhancement, and sympathetic in its collections. We grant the land—revenue—system all the goodness it claims and admire it from one point of view. A calculating genius could not have established a better system. We would give the Government all such credit as we would to a *Bania* of fair dealings. The State is the real land—lord, and in realizing the highest land—revenue the Government do their maximum of leaving a fair margin of profit to the holders of land. The system contributes to the excellent exploitation of the country in point of land—revenue. The present land—revenue of India is thus capable of expansion and can never be said to have reached its highest limit. So from the stand—point of a mere land—lord the land—revenue system of India can challenge all fair criticism, and will hold its ground against all odds.

But matters take a different turn and assume the most opposite aspect if we take a different stand—point of view. The poverty of the people gives us new platform from which we have to view things in the light of Indian people. The difficult problem of the day is the poverty of the people. There are no two opinions about existence. It is a fact admitted on its all hands. The supreme skill of the Government will lie in solving it in the immediate future. If the people do not get an adequate solution they would not rise to the greatness of the Western competition that threatens to kill them as members of the one nation and the citizens of the larger British empire. The Government achieved a marvellous feat of humanity when, there was a dreadful famine and human life was in great danger. This self-same humanity ought to teach the Government that it is better to remove the causes of famine than to meet it when it actually occurs. Relief—operations might be the most humane things. But it is still more humane to remove the chances of opening relief works. To increase the sum total of happiness is in short the work of the government. Happiness should be multiplied and augmented on al sides. This means a diminution of poverty. Before we begin our war with poverty we have to count the causes that have gradually brought on the present stage of poverty. It is not that the Government are not aware of these causes for we shall find them enumerated in a short quotation that we give below.

"But it is manifest that any one who shuts his eyes to the industrial and economic forces that are at work in India at the present time, and that are patent upon the surface of agrarian life, who does not take into account the ever-increasing sub-division of holdings (arising from the land-hunger of the peasant population and the inveterate reluctance of the ryot to move even to the smallest distance from his natal place), the decline of industrial occupations other than agriculture, the rack-renting to which tenants are subjected by the more inconsiderate class of land-lords and especially by middlemen of various degrees, the usurious rates of interest demanded by the money—lending class, the speculative expenditure upon litigation, the proneness to extravagance on festival occasions, and the numerous payments, in the form of petty bribes, among the ryots themselves, but who concentrates his entire gaze upon one aspect alone of their poverty, will carry away a most distorted impression both of the malady which he has set himself to diagnose and of the remedies which it is in the power or is the duty of Government to apply."

Herein the Government withdraw themselves from the work of doing away with the causes of poverty and call upon the people to find their own way out of it. Self—help is, no doubt, a divine principle but in the present condition of the people it is something like an impossibility. The Government ought to step in to do their parental duty towards the people. The have yet to build up India for her own people. In this discharge of duty they have to forsake and sacrifice the absorbing interests of the English people. It will not do for the Government to attribute the poverty to the doings of the people. They will have to begin the work of constructing India on the basis of material prosperity. Mere criticism is useless unless it be coupled with positive action. In relieving the people from the miseries of poverty one of the potent remedial measures is the lessening of the pressure of land—revenue. It will diectly make people more prosperous, will leave them a larger margin of profit and will enable them to provide well against an evil day.

## वऱ्हाड

हवामान—ढग पुष्कळ जमतात. पाऊस ही पडतो कीं काय अशी शंका वाटते. हवेंत असा फेरफार वारंवार होतो व किरकोळ ताप, खाकला वगैरे आजार आढळतात.

रोगराई नाहीं ही ईश्वराची कृपाच होय. प्लेग झालेला एक माणूस शेगांवास आला आणि मरण पावला. ही गोष्ट वाईट घडली. प्लेगाला प्रारंभ अशाच बाह्य प्रांतांतील लोक करितात. प्लेगाच्या रोगाचा उद्भव होऊं नये ह्मणून सिव्हिल सर्जन डाक्टर रेली हे शेगांवास गेले व त्यांनीं सर्व बंदोबस्त केला. एक महिन्यापूर्वी एक वृद्ध ब्राह्मण नाशिकाहून वाशिमास गेला. तो तेथें तापानें मरण पावला. प्लेगाचा संशय वाटल्यावरून तो जेथें मेला तें घर स्वच्छ हवाशीर केलें व त्यांतील माणसें दहा दिवस दूर ठेवण्यांत आलीं.

कर्नेल बार असिस्टंट कमिशनर हे इलिचपुरास रुजूं झाले आणि रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार असिस्टंट कमिशनर यांची बदली इलिचपुराहून हैदराबादेस झाली.

हैदराबादचे असिस्टंट कमिशनर राव बहादूर बाळकृष्ण काशीनाथ जोशी हे पेनशन घेणार असल्यामुळें त्यांच्या जागीं रा. रा. जठार हे जात आहेत.

' आकोला बाबूजी देशमुख नेटिव जनरल लायब्ररी'च्या १९०१ च्या वार्षिक रिपोर्टा वरून समजतें कीं वर्गणीदार ११६ होते ते १९४ झाले आहेत व वर्गणीचें दरमहा उत्पन्न ५७ रुपया पासून ८६॥। रुपया पर्यंत वाढलें आहे. लोक वर्गणी योग्य वेळीं देत नाहींत व मोठी कटकट करितात ही मामुली तक्रार चालूच आहे. राजा इंद्रकरण हे लाईफ मेंबर झाले, व्यवस्थापक मंडळीची व्यवस्था नीट होती तरी पुष्कळशा रड कथा रिपोर्टांत आहेत त्यांचा विचार चालूं सालची मंडळी नीटपणें करितील असा भरंवसा आहे.

' जळगांवकर प्रेक्षक ' आपल्या पत्राचा विचार पुढील अंकीं करूं.

मे. कुमार श्रीहरभामजी डिपुटी कमिशनर यांची स्वारी अबकारीच्या हरासा निमित्त आकोल्यास आली होती आज पासून साहेब बहादूर पुन्हां दवऱ्यावर गेले असून त्यांचे मुकाम येणें प्रमाणे होतील.-

| तारीख | मुक्काम |
| --- | --- |
| १७ फे. | हात. |
| १८ | लोहार |
| १९-२० | पारस |
| २१-२२ | वाडेगांव |
| २३ २४ | पातूर |

काल सायंकाळीं येथील लायब्ररींत रा. रा. डाक्टर वामन बाजी कुळकर्णी यांचें 'खाण्याचें मीठ व त्याचा आरोग्याशीं संबंध' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झालें.

## वर्तमानसार

हिंदुस्थानचे माजी गव्हरनर लार्ड डफरीन हे निवर्तल्याची बातमी आली आहे. हे गृहस्थ मोठे मुत्सद्दी पुरुष होऊन गेले. यांच्या योगानें कायदे कौन्सिलांत सुधारणा झाल्या.

हजार रुपयांचें बक्षीस—मद्रास युनिव्हर्सिटीच्या परीक्षेचे कागद बाहेर फुटले होते, ते कोणी कसे फोडले या बद्दल खात्रीची माहिती देणारास १००० रुपये बक्षीस देण्यांत येतील असें प्रसिद्ध झालें आहे.

रामबाण औषधी—मच्छरादि कीटकामुळें रोगाची साथ वाढते, त्यास अनेक उपाय सुचविण्यांत आले, त्यांत मुख्य व सोपा उपाय सल्फर डाय आक्साइड (गंधक) घरांत जाळावा ह्मणजे सर्व कीटकांचा नाश होऊन हवाहि स्वच्छ राहते. तशींच ऊद, उदबत्या, चंदनादि सुगंधिक द्रव्यें रोगहारक आहेत.

कुत्रे पोलिस—फ्रान्स देशाची राजधानी पॅरिस येथें कुत्र्यांचे पोलिस करण्यांत येणार आहे. जे लोक आत्महत्या करण्याच्या इराद्यानें समुद्रांत पडतात, त्यांना हे पोलिस कुत्रे ओढून काढणार व समुद्र किनाऱ्यावर दारूच्या येणाऱ्या जाणाऱ्या पिपांतून जे कोणी दारू काढून पितील त्या दारू पिणाऱ्या चोरानाही हे पोलिस कुत्रे पकडणार.

बादशाहाची पत्रिका— आपले बादशहा सातवे एडवर्ड साहेब यांची पत्रिका तंजोरच्या एका नामांकित ज्योतिषानें तयार केली आहे. त्यावरून असें दिसतें कीं बादशहाना आणखीं १९ वर्षें आयुष्य आहे. इंग्रजी ज्योतिष्यांनीं व उत्तर हिंदुस्थानांतल्या ज्योतिष्यांनीं वर्तविलें आहे कीं थोडक्याच महिन्यात बादशहावर फार कठीण प्रसंग येणार आहेत. ईश्वर त्यास चिरायुष सुखी राखो.

मर्कट भोजन— महाल मुरगोड पैकीं सोगल सोमनाथ येथें बेळगांव येथील कांहीं लोक गेले होते. त्यांनीं तेथील देऊळाजवळ सर्व अन्नाची तयारी करून वरण, भाजी, भात, क्षीर, पोळी वगैरे सामुग्रीनीयुक्त मर्कटास पानें वाढलीं, आणि मर्कटांस पानावर येऊन भोजन करण्याला यजमानानें प्रार्थना करिताच शंभर सव्वाशें माकडें आलीं व एकेका पानावर एकेक अशीं माकडें बसून गडबड न करितां यथास्थितपणें तीं भोजन करून पूर्ववत आपापले जागीं गेलीं, पानें वाढून भोजनास बोलावी पर्यंत एकाही माकडानें पानास स्पर्श केला नाहीं. असा लोकोत्तर चमत्कार पाहण्यास तेथें लोक जातात.

बोअर लोकांच्या पुढाऱ्यांनीं आपले अध्यक्षांना असें कळविलें आहे कीं, आपल्याला पूर्ण स्वातंत्र्य देण्याची पहिली शर्त असल्याखेरीज ब्रिटिश सरकारचें कोणतेंही तहाचें बोलणें आपण मान्य करणार नाहीं.

योग्य नोटीस— आलीकडे सोलापुरास प्लेग वाढत चालला आहे. तेव्हां तेथील डा. महादेव रामचंद्र रानडे यांणीं नोटीस दिली आहे कीं, कोणी वैद्य आपल्या औषधानें शेंकडा पन्नास प्लेगचे रोगी बरे करतील तर त्यांना सोलापुरास आणून त्यांचे स्वाधीन केसीस करण्याला आपण तयार आहों. त्यांच्या जाण्यायेण्याचा व जेवणाखाणाचा खर्च व शिवाय शंभर रुपये बक्षीस देऊं. हे डाक्टर व दुसरे लोकही बक्षीस देण्याला तयार आहेत. तेव्हां इकडे वैद्यांनीं अवश्य लक्ष द्यावें. वर्तमानपत्रांत नुसत्या जाहिराती फडकवून पैसे कमावण्यापेक्षां प्रत्यक्ष औषध देऊन पैसे कमावल्यास त्यांची दिगंतरी कीर्ती होणार आहे.

माशानें मनुष्य गिळला— हर्बानच्या बंदरामध्यें नुकताच एक मोठा शार्क मासा धरला आणि त्याचें पोट चिरलें तेव्हां त्यांत नाटालच्या सैन्याचा एक सगळाच सोल्जर त्यानें गिळलेला सांपडला.

विलक्षण चमत्कार— चितगांगकडे एक १९-२० वर्षांचा मुलगा ईश्वरोपासनेस एकाएकी लागला. त्याच प्रमाणें त्याची बहीणसुद्धा तशीच करूं लागली. हीं बहिणभावंडें हीन जातीची आहेत. यांस वेड लागलें किंवा यांनीं ढोंग मानविलें असेल या संशयावरून त्यांची पूर्ण कसोटी लोकांनीं घेतली. ते अंतरसाक्षी आहेत. त्यास मारिलें तर ते देवास लागते याचा प्रत्ययहि लोकांनीं घेतला. ते दुसऱ्याच्या मनांतली गोष्ट तात्काळ ओळखतात. हीं दिव्य शक्ती पाहून सर्वांस फारच चमत्कार वाटत आहे. याचा कोणी अगदीं विश्वसनीय शोध काढील तर खरें बाहेर येईल.

दुसरा चमत्कार— मोंगलाईतील काळगी तालुक्यांत एका बाईच्या अंगावर विंचवाच्या फुल्या आपोआप पडल्या. तसेंच तिच्या उरावर कणकेच्या बाहुल्या येऊन पडतात. देव ऋषीचे उपचार व शोध सुरू आहेत पण विंचवाच्या फुल्या पडणेंहि सुरूच आहे. ह्या पिशाच्च बाधेची चिंतवातमी लागली पाहिजे.

तिबेटन लोकांत सात दिवसांचा आठवडा नाहीं. पांच दिवसांचा 'पंचवडा' आहे व त्या पैकीं प्रत्येक दिवसाचें नांव 'लोह,' जल, काष्ठ, पिष्ठ व मृत्तिका अशा अर्थाचें आहे. पृथ्वीच्या पाठीवर एवढेंच राष्ट्र असें दिसतें!

पाठींत मोती— पारेगांव येथें एक मुसलमानीण बाळंत झाली असून मुलगी झाली तीस महिणीत असतां त्या मुलीच्या पाठीवर बिन छिद्राचीं चार मोत्यें सांपडलीं.

घरकाम्यांचीं रजिष्टरें— कोलंबोच्या म्युनिसिपालिटीनें स्वयंपाकी, पाणक्या, हेलकरी वगैरे लोकांचे रजिस्टर ठेवण्याचें ठरविल्यामुळें रंगूनची म्युनिसिपालिटीही असें रजिस्टर तयार करीत आहे.

पन्ना कमिशन आटपलें— अच्छालाल याला जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा झाली राणी कमलाकवर आणि दुसरे आरोपी दोषमुक्त झाले. महाराजा संबंधानें निकाल व्हावयाचा आहे. कमिशननें व्हाइसराय साहेबांकडे गुप्त रिपोर्ट केला आहे असें समजतें.

मौल्यवान लोकर:— अतिशय मौल्यवान लोंकर ह्मटली ह्मणजे समुद्रा मध्यें राहणाऱ्या पाणमांजरांची होय. ह्या प्राण्याच्या कातड्याची किंमत २०० पौंड पर्यंत येते.

रेशमी आंगरखा:— एम. झेपेनेक नांवाच्या एका राशियन मनुष्यानें एक प्रकारचें हलकें पण ताठ रेशीम तयार केलें असून त्याचा आंगरखा घातला असतां बंदुकीच्या गोळीनें तलवारीनें किंवा फटक्यानें मनुष्याला मुळीच इजा होत नाहीं असा अनुभव आलेला आहे ह्मणून युरोपाच्या मोठाल्या राजे लोकांनीं अशा नव्या रेशमाचे आंगरखे एम झेपानेक यांजजवळन मुद्दाम करून मागितलें आहेत.

निजाम सरकारच्या हद्दींतील पोस्ट ऑफिसें लवकरच इंग्रजी अमलाखालीं जाणार व तिकडील चलनी नाणें बंद करून सुरती नाणें सुरूं करणार, ह्मणतात.

रेलवेनें प्रवास करणाऱ्या नेटिव लोकांना चहा पिण्याची संवय लावून आपला व्यापार वाढविण्याचे हेतूनें कलकत्याकडील चहाच्या युरोपियन व्यापाऱ्यांनीं एक पैसा किंमतीच्या चहाच्या पुड्या काढल्या असून महिन्यामहिन्यानें गिऱ्हाईकांना बक्षिसें देण्याची त्यांनीं लालूच दाखविली आहे या युक्तीनें तिकडे गेल्या वर्षांत अशा ३ लक्ष पुड्या खपविण्यांत आल्या असें प्रसिद्ध झालें आहे!

नोटीस

बेशमी अमीर मिरझा वल्लद इसबेग मुसलमान कपाशीचा व्यापारी राहणार आकोट यांस:-

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, सुमारें एक महिना होत आला, तुह्मी मजपासून रुपये ५ पांचचा इसार, जामवाडी जिनांत घेतला त्या वेळीं असें ठरलें कीं तुह्मी आह्माला शंभर खंडी सरकी, भाव ४ प्रमाणें मोजून द्यावी. आह्मी दररोज सरकी मापून देण्याविषयीं तगादा करितो पण तुह्मी मापून देत नाहीं. आतां सरकीचा भाव फार वाढला आहे व त्यामुळें तुह्मांस अधिक पैशाची लालूच वाटून तुह्मी ठरलेला सौदा पुरा करण्याचें नाकरिता. सबब कळवितो कीं, ही नोटीस पोचल्या पासून एक दोन दिवसांत शंभर खंडी सरकी ठरलेल्या भवा प्रमाणें मापून द्यावी, व आपले पैसे घेऊन जावेत. असें न कराल तर आज कालच्या बाजार भावा प्रमाणें जें आमचं नुकसान होईल तें कोर्ट मार्फत भरून घेतलें जाईल. व अखेर निकाला पर्यंतचा सर्व खर्च तुह्मावर पडेल. कळावें तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ०

सही.

पुंजाजी वा सीतारामजी जिनगर

राहणार आकोट दस्तुर खुद्द.

---

जाहिरात

सर्वत्र लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येते कीं मी आकोल्याहून पातुरास तारीख १८।१।०२ चे रात्रीं बैलगाडीनें जात असतां १५ मैलाजवळ गाडी येताच दुसरीकडून उंट आले त्यामुळें बैल बुजाडून गाडी सडकेच्या खालीं जाऊन रानांमाळ गाडी गेली त्यामुळें आमचे सामान कांहीं गमावलें व कांहीं सांपडलें. सामान गेलें त्याची यादी:—

१ महादु वल्लद पुंजाजी माळी राहाणार पातुर शेखबाबू याचे खरेदीखत ३०० शें रुपयाचें रजिस्टर केलेलें.

२ अंबाई माळीण राहणार पातुर शेखबाबू इचे पट्टेखत पांच वर्षाचे रजिस्टर केलेलें.

३ परशराम माळी पातुरकर याचे पट्टेखत ४ वर्षांचे रजिस्टर केलेलें.

४ भाडे चिट्टी रावो माळी याची रजिस्टर केलेली व दुसरी पुंजाजी केवटी याची १२९१ ते १२९९ पावेतो पाच वर्षांची घाणमळ्याच्या शेताबद्दल एक रुपयाचे स्टांपावर लिहिलेली.

५ नकला व टिकीटें वगैरे सामान.

येणें प्रमाणें सामान गेलें. सर्व सामान उपरण्यांत बांधलें होतें त्या सुद्धां जो कोणी आह्मास आमचें सामान आणून देईल त्यास आह्मी १० रुपये इनाम देऊं कळावें. ता. १४।२।०२

(सही) जयराम काशीनाथ देशपांडे पातुरशेखबाबु.

---

नादारी मुकदमा नंबर १/१९०२

नादारी नियमा अन्वयें नादाराला नादार ठरविणें विषयीं त्याचे सावकारास नोटिशीचा नमुना.

जी

विद्यमान किंग साहेब नादारी कोर्टाचे जड्ज्य साहेब जिल्हा वाशीम यांचे कोर्टात.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येते कीं जयराम व सिवराम वल्लद नागूजी राहणार वोंडाळ झामोर तालुके वाशीम हा नादार आहे असा आज तारीख २० माहे १ सन १९०२ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १९ माहे मार्च सन १९०२ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराला तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यांनीं त्या बद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या अधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीदारांस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नावें नमूद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या दोन तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यांस नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचें स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञालेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एकाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेंपणाविषयीं शपथ करावी आणि ती यादी टपाला मार्फत कोर्टास पाठवावी, ह्मणजे दावा रजिष्टरांत दाखल होईल. तारीख ६-२-१९०१

S. H. King

नादारी कोर्टाचे जज्ज

वाशीम

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यात ... ण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसि — —

REGISTERED N. No. 4

वर्षाचा आगाऊ ५ टपाल ०१३
सहामाही " ३ " ०८
साल अखेर " ७ " १ ०८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........०१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....०१

Annual in advance 5 Postage 13 as
Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly........ 3 .............. 8 as
Single copy ............................. 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line....3 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 24 FEBRUARY 1902 NO 8

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ० अंक ८

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नावांनें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेकडां ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १९ जुलै
१८९८


A. G. Watson
Agent.

## खरेद करा !

## रास्कोपची थेट व खरीं पेटेंट वाचेस नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतिचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकास ह्मणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच वर्णे विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणाची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्याबद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—वरपुढील नमुना २१ लाईनचें मोठ्या आकारांचा वॉचचा आहे.



मोठे, मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस......................४०
१९ „ हंटिंग..............................[illegible]

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.

रास्कोप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह...........२०
१९ „ मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ................२२
१९ „ हाफ हंटिंगचें................२०
१९ „ हंटिंगचें ......................२०
१४ „ रिस्ट वॉच ....................२०

### इनॅमल मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपन फेस...........२०
१९ „ हंटिंग.............................२०
१४ „ रिस्टवॉच.........................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ...........३०
१४ „ हंटिंग..........................३५
१८ व १९ „ ओपनफेस............३०
१९ „ सेकंद कांट्यासह ............३२
१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ...............३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ..................... ४९

लेडीज वॉचेस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

**सी. हीनीगर आणि कंपनी.**
ओरिजिनल जिनीयन रास्कोप पटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

## नोटीस

रा. अवधूत वल्लद गणू कुणबी राहणार लांबकाणी पोस्ट अडगांव तालुक आकोट.

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं अजी मर्दे विठू इजपासून मोजे लांबकाणी येथील शेत सर्व्हे नंबर ५६ आणि ६२ पैकीं व घर असे तारीख ६।९।९८ रोजीं ७०० रुपयास बळीराम वल्लद जानजी यानें खरिदी घेतलें असून ताब्यांतही घेतलें. त्यापैकीं बळीराम यानें सदरहू घर बळू वल्लद दर्याजी यास ५० रुपयास तारीख १६।८।१९०० रोजीं विक्री केलें. हा सर्व खरिदीचा व्यवहार तुमचे खरिदीखत लिहिण्याचे पूर्वी तुह्मास कळविला असतां तुह्मी मला असें सांगितलें कीं अजीचा तूं चुलत वारसदार आहेस व अजीस खरिदी देण्याचा काय अधिकार ? असें सांगून मजपासून सदरहू शेत व घर ५०० रुपयास तारीख ३०।१।१९०२ रोजीं पोकळ खरिदी लिहून घेऊन सदरहू ५०० रुपयांपैकीं ९४ रुपये नोंदणारे अंमलदारासमक्ष माझे हातीं देऊन बाहेर आल्याबरोबर परत घेतले व बाकीचेही रुपये दिले नाहींत. सबब या नोटिसीनें कळवितों कीं मला ५०० रुपये पावले नाहींत व लिहून दिलेलें खरिदीखत बातल आहे. ते खरिदीखत ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत परत द्यावें अगर खरिदीचे रुपये द्यावे. असें न झाल्यास झालेला खरिदीचा व्यवहार रद्द आहे असें या नोटिसीनें कळविण्यात आलें आहे. कळावें. तारीख १७–२–१९०२ इ

सहीची निशाणी वखर

शिवराम वल्लद कृष्णाजी कुणबी राहणार पुंड तालुक आकोट पोस्ट आसेगांव, याचे हातची असे.

## नोटीस

शेठजी शंकरलालजी वल्लद कस्तूरचंदजी मारवाडी, कसबे नांदुरा तालुका मलकापूर.

यांस:—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें असें कळवितों कीं, रा. रा. शिवलालजी वल्लद काशीराम मारवाडी वस्ती वाडी हे आपल्या दोघामधील तंटा मिटविण्यासाठीं माझ्या तर्फे पंच नेमिले होते पण त्यांचें आमचें मन बरोबर नसल्यामुळें मी त्यांची पंचाइती रद्द केली होती व त्या प्रमाणें तारीख २७ जानेवारी सन १९०२ च्या वऱ्हाडसमाचार पत्रांतून त्यांस नोटिशीनें कळविलेंहि होतें. तरी पण तुह्मी व त्यांनीं त्या नोटिशीस बाजूस ठेवून आपल्या मना प्रमाणें पंचाइतीचें काम उरकून घेतलें. असो. आतां हेंच कळविणें कीं, झालेली पंचाइत मला बिलकूल संमत नाहीं. मी दुसरा पंच मजतर्फे नेमून देण्यास कबूल आहे. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत आपण माझ्या गावीं येऊन मी नेमितों तो पंच पत्करून पुन्हां पंचाईत करावी. व आपल्या भांडणाचा निकाल लावावा. असें न कराल तर मला फिर्याद अर्यादी मुळें जो खर्च वेच लागेल व नुकसान होईल ती तुह्मांपासून भरून घेतली जाईल. कळावें तारीख १८ माहे फेब्रुवारी सन १९०२ इ.

सही

परमसुखदास कस्तूरचंद मारवाडी रहाणार पेटली तालुके मलकापूर पोस्ट नांदुरा दस्तुर खुद्द.

## नोटीस

रा. रा. गणपती वल्लद मानसिंग पाटील राहाणार शिरसोली परगणें अडगांव तालुके आकोट

यांस:—

खालीं सही करणार ह्याजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी तारीख २३।१।१९०२ च्या शुद्धवऱ्हाडी पत्रातून आह्मांस नोटीस दिली तिचें उत्तर खालीं लिहिलें प्रमाणें असे:—

मौजे शिरसोली येथील स. नं. २४३ व २४४ ह्यांच्या विक्री संबंधानें तुमच्याशीं आमचा जो ठराव झाला आहे तो तुह्मी ह्मणता त्या प्रमाणें नाहीं. खरेदीचा करार मि० आश्विन वद्य १४ सं. १९५८ मारु रोजीं झाला. त्या वेळीं तुह्मी सदरहू शेतांच्या किमती बद्दल रुपये ३८०० सुमारें १५ दिवसांत देण्याचें कबूल केलें व करारशीर रुपये न दिल्यास सदरहु रुपयावर व्याज दर महा दर शेकडा रु. १ प्रमाणें देण्याचा करार केला; व त्या प्रमाणें रुपयांची आदाई झाल्या नंतर सदरहु शेतांबद्दलचें खरेदीखत तुह्मांला जरूर वाटल्यास तुह्मी आपल्या खर्चानें आमच्या कडून करून घ्यावें व खरेदीखताची जरूरी न वाटल्यास, सदरहु शेतांचें खातें फत्तेलालजी मारवाडातून आल्यावर त्यांनीं तुमच्या नांवानें बदलून द्यावें अशा आशयाचा करार तुमच्या व आमच्या मध्यें ठरला होता. असें असून किमतीची रक्कम अद्याप पावेतो तुह्मी पुरी भरून दिली नाहीं सबब ह्या नोटिशीनें तुह्मांस कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत राहिलेली रक्कम व व्याज वर लिहिलेल्या करारा प्रमाणें तुह्मी आणून आमचे दुकानीं भरावी ह्मणजे तुह्मांला जरूरी वाटत असल्यास सदरहु शेतां बद्दलचें खरेदीखत आह्मी वर दर्शविलेल्या करारा प्रमाणें तुमच्या नांवानें करून देऊं. खरेदीखत करून घेण्याची जरूरी तुह्मांस वाटत नसल्यास, फत्तेलालजी देशांतून परत आल्यावर ते सदरहु शेतांचें खातें तुमच्या नावानें बदलून देतील. ह्या प्रमाणें तुमचे कडून वर्तन न घडल्यास तुमच्यावर रुपयांबद्दल फिर्याद करणें आह्मांस भाग पडेल. कळावें, तारीख १९।२।१९०२ इ०

सही

शिवलाल गुलाबचंद तर्फे मुखत्यार गोविंदराम भिकमदास दस्तुर खुद्द.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाउसचा कर वसूल करण्याचा सन १९०२–१९०३ सालचे हक्कांचा लिलांव तारीख ८ मार्च १९०२ इसवी रोजीं सकाळीं आठ वाजतां टौन हालांत केला जाणार आहे. ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदरहू वेळीं टौनहालांत हजर व्हावें. कळावें तारीख २१ फेब्रुआरी सन १९०२ इसवी.

K. G. Damle
Secretary
Akola M. Committee.


---


वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य २ शके १८२३


---

## शेतकऱ्याची पेढी.

शेतकऱ्याची पेढी स्थापण्या संबंधानें सरकारचे विचार नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत. त्या विचारांच्या सरळपणा वरून आह्मांस वाटेंत कीं, लार्ड कर्झन साहेब आपली कारकीर्द वरील संस्थेच्या स्थापनेनें अजरामर करतील. लोकहिताची गोष्ट नेहमीं यशप्रद असते आणि तें यश वरील लोकहिताच्या कार्यानें लार्ड कर्झन साहेबांस मिळावें अशी आमची फार फार इच्छा आहे. पेढी सांपतच्या गरिबीला मोठी आश्रयदाती होईल. ज्यांच्यापाशीं शेतीवाडी मालकीची आहे पण कर्जामुळें ज्यांचें डोकें वर निघत नाहीं अशा गरजू लोकांस कमी व्याजाच्या द्वारानें मदत मिळावी आणि तसेंच त्यांस योग्यवेळीं कर्ज मिळावें, असा या पेढीचा मावार्थ आहे. पण जे लोक कर्जामुळें अगदींच नागवले आहेत त्यांच्यासाठीं मात्र ही पेढी कांहीं करूं शकणार नाहीं. आमच्या प्रांतांत व्याजाचे दर फार कडक आहेत. आणि व्याजापायीं पुष्कळशीं संभावित वतनदारांचीं घराणीं बुडालीं आहेत. ही निकृष्ठावस्था पुष्कळशा लोक समाजावर आपलीं दुष्ट कार्यें करीत आहे. ही दूर होण्याचा उपाय सरकारच्याच मदतीनें साध्य होण्या सारखा आहे. आमचा अनुभव असें सांगते कीं, वऱ्हाडांतील सावकारीच लोकांच्या दारिद्र्याला मोठी कारणीभूत झाली आहे. आणि सरकारी कोर्टाची न्यायपद्धतिही लोकांस पक्केपणीं भिकारी करून सोडीत आहे. सावकारीला चांगल्या व्यापाराचें स्वरूप नाहीं. कारण खरी सावकारी कुळाला व सावकाराला सारखी लाभप्रद झाली पाहिजे. [illegible] प्रकार विशेषत सावकारी संबंधानें नाहीं. ही सावकारी व्याजाच्या रूपानें कुळाला खंक करून सोडते. हा तिचा वाईटपणा घालविण्याला सरकारि आश्रयानें व भांडवलानें शेतकऱ्यांची पेढी निघाली पाहिजे. आमच्या स्थानिक सरकारानीं एखादी पेढी काढण्याची गोष्ट फार लांबची आहे. पण निदान ‘ तगाई ’ च्या सदराखालीं तरी विशेष सढळपणानें लोकांस मदत करण्याचा परिपाठ सरकारानें अधिकाधिक अमलांत आणिला पाहिजे. १९००।१९०१ सालीं एकंदर १,६०,८७१ रुपये वाटण्यांत आले. ही रक्कम फारच कमी आहे. अशा किरकोळ रकमांनीं लोकांच्या गरजा भागत नसतात. सारांश मोठमोठ्या इस्टेटी सावकारांच्या घशांत उतरण्या पूर्वींच माफक व्याजानें कर्जें देण्याची पद्धति चांगली चालू झाली पाहिजे.

## क्षेत्रफळाची फोड

वऱ्हाड प्रांताचें क्षेत्रफळ १७७४३-६१ चौरस मैल आहे. या क्षेत्राची खालील फोड समजून घेण्या सारखी आहे:–

| | चौरस मैल |
|---|---|
| वहिती कडे | १२५३२.४९ |
| वहितींत येण्या सारखी | ९६४-६७ |
| स्टेट-फारिस्ट | ३८८१.९ |
| गांवठाणें, तलाव, नद्या | ३२४ |
| गुरें फुकट चारण्यासाठीं | १६९.३३ |
| गांवच्या कामासाठीं | ९०.७७ |
| वहितींत न येण्या सारखी | ३८४.३८ |

वरील आंकड्या वरून हें लक्ष्यांत येईल कीं गुरांच्या चारणीला जंगल पुरेंसें नाहीं. तसेंच गांवाला खुली जागा लागते तितकी पुरेशी जागा मुळींच सोडलेली नाहीं.

१२९३९ चौरस मैल जमीन वहितींत आहे पण त्या पैकीं १९००-०१ सालीं १०६९ चौरस मैलाचें क्षेत्र पेरण्यांत आलें. एकंदर पेरा झालेल्या जमिनी पैकीं शेंकडा ९०.९ जमिनींत खरिपाचें पीक होतें. शेंकडा ८.९ या प्रमाणाची जमीन फक्त रब्बीच्या पिका करितां ठेवण्यांत आली होती, शेंकडा १ चौरस मैल जमिनीला पाणी देऊन पिकें काढण्यांत आलीं. खरिपाच्या पेऱ्यामध्यें जवारीचा पेरा मोठा होता व त्याच्या खालोखाल कपाशीचा पेरा झाला होता. दुष्काळा नंतरच्या वर्षीं जवारीचा परा थोडा अधिक होणें स्वाभाविकच होतें. रब्बीच्या पिका संबंधानें लोकांचें मोठें दुर्लक्ष्य आहे. एकंदरीनें जेवढ्या शेतींत रब्बी होती त्या जमिनीची वर्गवारी निरनिराळ्या धान्या वरून ध्यानांत धरण्या सारखी होईल जवळ जवळ तृतियांशा पेक्षां थोड्या अधिक जमिनींत गहूं होता. चौथाई जमिनीवर जवस होता, व षष्टांशा पेक्षां जास्त जमिनीवर हरबरा होता तिळाचें पीक अगदींच थोडें आहे. त्यांतल्या त्यांत खरिपांतला तीळ रब्बीतल्या तिळापेक्षां दुप्पट असतो.

वरील हकीकत १९००।०१ सालांतील पिकांची होय; पण सरासरी अशीच स्थिती दरसालीं होत असते. रब्बीचा पेरा फार कमी झाला असल्या संबंधानें कांहीं दिवसापूर्वीं आह्मी आपले विचार प्रदर्शित केले होते. आमच्या मतानें रब्बीचा पेरा कमी होणें चांगलें नाहीं. रब्बीचा पेरा वाढविण्या विषयीं कांहीं सक्तीचे नियम करून व रब्बीचें पीक घेणाऱ्याला कांहीं सवलती देऊन सरकारानें शेतकऱ्यांचें मन वळविलें पाहिजे. खरिपाच्या पिकाची शाश्वती अधिक वाटते त्या पिकाचा बाजरांत पैसा होऊन तो लवकर लोकांच्या हातांत खेळूं लागतो आणि नफ्यानें शेती वाहण्याचा प्रघात वाढल्यामुळें पहिलेंच पीक काढून घेणाऱ्या भरीला वहितदार लागतो या कारणांचें संशोधन करून काय तो उपाय लवकर अंमलांत येईल तर पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे.

## प्लेगाची धास्ती

गेल्या अंकीं आह्मी उंदिरांच्या अनर्था संबंधानें लिहिलें होतें. हा अनर्थ दुसऱ्या प्रचंड अनर्थाला बोलावतो कीं काय असाही आमच्या मनांत किंतु आला होता. हा संशय दृढ होण्याला गेल्या चार दिवसांत खामगांवच्या बातमीची वीज येऊन आदळली. असें कळतें कीं, खामगांवच्या जलाल पुऱ्यांतील एका घरचीं एकदम तीन माणसें गांठीच्या रोगानें मेलीं. ही गांठ ह्मणजे प्लेगाची खूण असा लोकांचा समज आहे. उंदिरांची समृद्धि सर्वत्र आहे आणि त्यांच्यावर हा रोग लवकर लागूं होतो असें ह्मणतात. त्याचा खरेपणा खामगांवच्या डाक्टराला कसा काय आला आहे हें अजून समजत नाहीं. सिव्हिल सर्जन डाक्टर रेली व मे. कुमार श्री हरभामजी हे उभयतां संशयाच्या घरीं मुद्दाम गेले होते. रितीरितीची व्यवस्था करण्यांतही आली.

ईश्वर कृपेनें हा प्लेग आमच्या पासून फार दूर आहे. पण तो जर खरोखरींच डोकावूं पहात असेल तर लोकांस प्रतिबंधक उपाय सुचविण्यासाठीं डाक्टर रेली साहेब हे कांहीं आवश्यक हुकूम सोडतील, तर पुष्कळ बरें होईल.

## मागें पाऊल

लोअर हायरच्या परीक्षांचे नियम बदलून आले आहेत. हा फेरबदल करण्याचें प्रयोजन मोठेंसें नीट दिसत नाहीं. हा फेरफार सुधारणेच्या दृष्टीनें करण्यांत आला असतां तर आह्मास त्याचें फारसें वाईट वाटलें नसतें. अगोदरच या परीक्षा शिळपट असतात. जे अधिकारी न्यायाधिशांचें काम करितात त्यांस ही हास्यास्पद परीक्षा नको आहे. ही परीक्षा ह्मणजे एक मोठा बागुलबोवा करितात. अगोदर अनधिकारी माणसाला अधिकार द्यावयाचा आणि नंतर तो चालवितां यावा ह्मणून ही परीक्षा नेमलेली असती.

या परीक्षेची महती फार मोठी आहे. ती चाकरी संभाळते, बढतीला देते आणि अधिकाराला सत्पात्र ठरविते. या परीक्षे पुढें एल. एल. एल. बीची विद्या सुद्धां व्यर्थ होय. एल. एल. बीची परीक्षा उतरलेल्या अधिकाऱ्याला देखील दिवाणी फौजदारीची परीक्षा निराळी द्यावी लागते, हा एल. एल. बी. परीक्षेवर जो कटाक्ष बसला आहे तो या नव्या फेरफारांत दूर न होतां कायमच राहिलेला आहे मुख्य फरक एवढाच कीं दिवाणीच्या परीक्षेला हिंदु लॉ व महानेडन लॉ वाचण्याची जरूर ठेविली नाहीं. असा नियम घालण्याला कारण एकच दिसतें कीं, न्यायाधीश झाल्या नंतर हिंदु लॉ किंवा मुसलमन लॉ प्रमाणें निकाल करितांना तो कायदा गुंडाळून ठेवावा असा ध्वनित अर्थ निघतो. आमच्या सरकारी अधिकाऱ्यांमध्यें हिंदु मुसलमानांच्या कायद्याचा हा भेदाभेद असूं नये अशा हेतूनें नवे नियम करण्यांत आले असावेत असाही एक तर्क आहे. या नवीन नियमांनीं आळशी अधिकाऱ्यांवर हा उपकारच केला आहे ह्मणायाचा.

ज्याच्या अधिकाराला लोअर परीक्षा पुरे आहे त्याला वरची परीक्षा देणें असेल तर त्यानें अलिशान रेसिडेंट अगर कमिशनर यांची परवानगी अगोदर मिळविली पाहिजे. जो सरकारि चाकर नाहीं पण ज्याला चाकरीची हांव आहे त्यानें लोअर हायर परीक्षा देण्यासाठीं पूर्वींच परवानगी मिळविली पाहिजे. अशा बिन–सरकारी उमेदवाराकडून दरसालीं परीक्षेची फी ३ रुपये वसूल करण्यात येईल. ही गोष्ट सरकारची द्रव्यदृष्टी दाखविते पण ही फी पंचवीस पन्नास रुपये असती तर त्या फीचा कांहींसा दरारा परवानगी मागण्यावर बसला असता.

या पुढें लोअरच्या परीक्षेला प्रश्नाचे कागद निराळे आणि हायरच्या परीक्षेला निराळे असा फरक करण्यांत आला आहे. या नियमांतील एक्झॉमिनेशन सिंडीकेट हे नांव युनिव्हर्सिटीचीच आठवण देते.

## संस्मृति.

संस्मृती सारखी आनंददात्री आणि विस्मृती सारखी दुःखविमोचनी दुसरी नाहीं. पण स्मृति पहिल्या प्रकारची होण्याला मनावर संस्कार चांगलेच घडले पाहिजेत भूतकालीन आनंदाची स्मृति आनंदच देईल. गत गोष्ट सुंदर होती पण ती आतां फिरून येणारी नाहीं, अशा स्थितींत स्मृति जर पुन्हां कल्पनासृष्टि उभारील आणि तेथें पूर्ववत् आनंदांत डोलूं देईल तर ती आपली खरी जीवलग होय, आणि तिलाच संस्मृती ह्मणतात पण स्मृति जर आपलें सौख्य नष्ट झालें ह्मणून विषाद उत्पन्न करील तर ती स्मृति त्या माणसाला दुःखी व कष्टी करील इतकेंच नाहीं तर त्याला आनंदकलेची खरी ओळख पटली नाहीं असें ह्मणावें लागेल. आपली प्रिय वस्तु डोळ्यापुढें रेखाटावी आणि तिचा प्रियकरपणा कल्पनेनें पुन्हां उपभोगावा या सारखी सुखाची किमिया या दुनियेंत खरोखरी कोठेंहि सांपडणार नाहीं. एका प्रफुल्ल सुवासिक पुष्पाची बहार आज नेत्रानें लुटली आणि तें पुष्प कालवशात नष्ट झाल्या नंतर जर स्मृति पुन्हां ती बहार मनसृष्टींत निर्माण करील तर ती स्मृति ईश्वरी प्रसादच होय. आनंद अव्यभिचारी वडला आणि स्मृति आपली मैत्रीण बरोबर असली तर ब्रह्मसुखाची वाट सांपडण्या[illegible] दूर जाण्याची गरज नाहीं, आनंद [illegible] ह्मकला आहे

आणि ती सर्व नश्वर वस्तूंतील शाश्वत कला होय. जगाच्या राहाटी प्रमाणें वस्तु लय पावतात. पण ह्या वस्तूंच्या सुखकर गुणांचा आस्वाद स्मृति पुन्हां घेऊन दईल तर तीच स्मृति जन्मभर आनंदात्री होईल. स्मृतीनें आनंदस्फूर्ति उठावी व गत गोष्टींतील आनंदच घेतां यावा अशा साठीं माणसानें आपल्या स्मृतीला तसा संस्कार दिला पाहिजे. स्मृति आनंददात्री व्हावी अशा साठीं दुःखाच्या गोष्टी विसरण्याला शिकलें पाहिजे. संस्मृतिच दुःखाची विस्मृति ठेवण्याला शिकविते. संस्मृतिच विस्मृति शिकविते असें म्हणणें शद्ब विपर्यास होय पण खरोखर यांत विपर्यास काहींच नाहीं. सुखैक गोष्टींचीच स्मृति व्हावयाची व दुःखद गोष्टींच्या विटाळाची सावलीहि ह्यावर पडायाची नाहीं अशी संस्मृति विशिष्ट संस्कारानीं अंगांत बाणते असा अनुभव आहे. आणि मग अर्थातच दुःखाची विस्मृति आपोआपच होणार हे उघड आहे. ह्या अंतर्यामांच्या गोष्टी शद्ब पांडित्यांच्या कक्षेंत मावत नाहींत. त्या सहृदय अंतःकरणासच उमगणार आहेत. किट्स कवीनें ह्मटल्या प्रमाणें माणसाला वृक्षवर्गाची विस्मृति लाभेल तर आनंदाची खाण सांपडल्या सारखें होईल. वृक्षाचे पर्ण गळूं लागले ह्मणजे तो एक अनुकंपनीय रूप धारण करितो; तेव्हां त्याला त्याच्या पूर्व वैभवाचें स्मरण होत नाहीं. काळ पाहून तो वागतो, धैर्य सोडीत नाहीं आणि ह्मणूनच त्याला वसंतऋतूची पल्लवी पुन्हा फुटूं लागते. वृक्षाची विस्मृति माणसाला येइल आणि तो विपत्कालीं आपलें स्थैर्य सोडणार नाहीं, व गत वैभवश्री विषयीं हळहळ मानणार नाहीं तर त्याला सुखकर संपत्कालीं नैसर्गिक शालीनता येईल. या शालीनतेनें शोभणारा माणूस विस्मृतीचा फायदा जाणूं शकेल. विस्मृतीनें मन आरशा प्रमाणें स्वच्छ राहतें आणि सदासर्वदा विस्मृति तें मन सुप्रसन्न ठेवितें.

संस्मृति प्राप्त कालच्या अनिवार दुःखांचेंहि परिमार्जन करिते इतकेंच नव्हे तर त्या दुःखार्णवांतून प्रत्यक्ष सौख्यानंदाच्या अनंत लाटा उत्पन्न करून त्यांचें सचेल स्नान घालतें अशा संस्मृतीचा वा विस्मृतीचा ठेवा पूर्व संचितानें, सत् समागमानें, व ईश्वरी कृपनेंच लाभतो. एखाद्या गोष्टीची स्मृति वा विस्मृति ठेवणें ह्या पैकीं एकहि गोष्ट आपल्या कह्यांत नाहीं याचा अनुभव सर्वांस आहे. या गोष्टीचें मी चिरकाल स्मरण ठेवीन ह्मणून निदिध्यास घेतला तरी ती अचूक विसरली जाते, तशीच ही गोष्ट मी विसरीन तर बरें असें एक सारखें वाटूनच कीं काय ती पक्कीणीं मनांत वसते. तर संस्मृतिच निरंतरची राहवी ह्मणून मनुष्यानें प्रयत्न करावा ह्मणजे तो सच्चिदानंद आपल्या जवळच उभा आहे हें निराळें सांगणें नलगे.

---

## यम स्वरूपी

रामजी बिनआप्जी नांवाच्या गृहस्थांनीं व्हाईसराय साहेब के, हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांकडून एका लाक विनंती अर्ज पाठविला आहेहे काय ? ानांतील गरीब लोकाना आलेलीपाणि पाहा, अधिकारी राजपुरुषरूपी सस्र्म वर्तविली आहे व लोकांस पीडा देऊन त्यांचा छल करण्याच्या कामीं पोलिस रूपी शनीश्वरास अग्रगण्यस्थानीं अधिष्ठित केलें आहे. अर्थात् बाकीचे ग्रह या पुढें तुच्छ होत. अशा ह्या उग्रतम शनीची शांति तुष्टि करणाऱ्या जपजाप्यादि मंत्रांचें बरोबर पठण न झालें तर काय अपदा केव्हां प्राप्त होतील याचा भरंवसा नाहीं. ज्या प्रमाणें काळ प्राण्यास केव्हां ओढून नेईल याची क्षणाचीहि शाश्वती नाहीं तद्वत् ह्या काळस्वरूपी पोलिसाचा दंडा केव्हां पाठीवर बसेल याचा नेम नाहीं. ह्या काळया यमदूतांस पाहून कोणच्या अनाथ प्राण्याचा जीव थोडाथोडा होणार नाहीं बरें! व ह्या यमस्वरूपी पुरुषाची आपल्यावर कधींहि वक्र दृष्टि नसावी असें कोण चिंतणार नाहीं बरें ! कारण शनीच्या दृष्टीचा प्रभाव अगम्य असा ग्रंथांतरीं लेखिलाच आहे. एका प्रसिद्ध लेफ्टनेंट गव्हरनर साहेबांनीं एकदा असें बोलून दाखविलें आहे कीं, जर कदाकाळीं हिंदुस्थानचे लोक इंग्रजांविरुद्ध उठतील तर त्यास पोलिसचा रयतेवरचा जुलूम व जाच हेच आद्य कारण होईल.

वस्तुस्थिती पाहतां पोलिसासंबंधीं लोकांचे असे दुःखोद्गार असावेत आणि शनी, काळ, यम, आदिकरून दुःश्चिन्ह सूचित उपमांनीं त्यांचा नामनिर्देश व्हावा हें सहाजिक आहे. पण पोलिसांनीं आपल्या कृष्ण कारवाईनें अशीं सार्थ पण त्याज्य उपपदें मिळवावीं हें मात्र चांगलें नाहीं. आपलें कृष्ण कारस्थान ढावळपणें व सहजावारी लोकांच्या नजरेस येऊं नये, ह्मणूनच कीं काय ते आपला पोशाख एकजात काळा बनवतात कोण जाणें ! असा त्यांचा समज असल्यास तो निर्फल श्रम होय, व तो त्यांनीं जितका लवकर होईल तितका लवकर दूर करावा हे बरें. कारण त्यांच्या काळया डगल्यामुळें त्यांचें खरें कृष्ण रूप कदाचित दिसणार नाहीं ह्मणूनच लोक त्यांच्यावर विशेष काक दृष्टीनें पाहातात व त्यांच्या दृष्टीस पोलिसांचें अंतर्बाह्य रंगरूप अभिन्नत्वास मिळालेलें असावेसें दिसतें.

खरोखरी पोलीस खात्याबद्दल लोकांची विशेष पूज्यबुद्धि व आदर असावा, कारण पोलिस हे लोकांच्या सुखवृद्धीसाठीं आहेत. दुष्टांस शासन मिळावें, व चांगल्यांचें संरक्षण व्हावें या कामासाठीं पोलिसाची अधिकार पदावर योजना आहे. अपराध्यास दंडा लावणारे लोक सगळ्यास आवडणार नाहींत काय ? लोकांचा छळ करणाऱ्या दुष्टांसच त्यांची भीति उत्पन्न व्हावी असें असतां गरीब सूज्ञ लोकांसच त्यांचा इतका दरारा वाटतो या वरून आपल्या तात्विक विवेचनाची व वस्तुस्थितीची जुळणी जमत नाहीं हें उघड आहे.

पोलिसजवळ असलेला दंडा आपल्यास मारणारा नव्हे तर तो आपला साह्यकारी आहे असें सर्वांस वाटलें पाहिजे. असें लोकांस वाटत नसल्यास तो अपराध सर्वस्वी पोलिसचाच आहे. आणि ह्मणून पोलिसनें आपलें कार्यकर्तृत्व चोख केलें पाहिजे. पदरीं राखलेलें सेनाबल राजा वरच उलटूं लागलें व विश्वासघात होऊं लागला तर मग निरुपायाची गोष्ट होय. बहुतेक पोलिस लोक हलक्या दर्जाचे, अशिक्षित, व असमंजस असतात. अशा माकडांच्या हातांत अधिकाराची कोलीत मिळाली ह्मणजे मग अनर्थास काय कमी ? सर्व अधिकारसंपदा सूज्ञ जनांच्याच उपभोग्य वस्तू होत. ह्मणून ह्या इष्ट जनांसच लाभाव्यात ह्मणजे इष्टच घडून येणार आहे. पोलिस खात्याची सुधारणा ह्याच तत्वावर झाली पाहिजे. ह्मणजे मग खुंटीनेंच नवरत्नांचा हार गिळला असे जे विचित्र अनर्थ होतात त्यास जागा मिळणार नाहीं आणि अनादिकालापासून चालत आलेली दंडधारींची कृर्ण कीर्ति सोज्वल राहील.

---

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 24 1902

---

The Administration Report for 1900—01 speaks to the costly administration of the province. The more is the revenue the greater is the expenditure. This is the short analysis of the Berar finances. It is no feat of a sound economy. The increase in revenue implies two things. One is the development of the sources of revenue and the other refers to the greater fleecing of the ryots. It seldem happens that one of these two items forms the sole feature of the increase of revenue. Both exist concurrently and tend to minimize the dis-agreeable phase of the *prosperous* finances of a state. The large finances do not necessarily point to the happy and prosperous condition of the provinces. There are certain draw-backs in the increasing revenues. When material wealth ceases to expand and admits of no more multiplication there is the danger into which the Government run of over—taxing the people. We think that our province stands in the same predicament in which the growth in revenues does not correspond with the growth in the wealth of the people. The people are conseqently over-taxed for the purposes of administration. Branches of expenditure are vastly multiplied before a province is able to pay the heavy price of the comforts of the British civilization. In attaining to the higher standards of an efficient and powerful administration, the Government have to spend more than the income which an agriculture province can yield in the times of peace and safety. We are not however certain that there is an approximate approach to such high standards. The Berar administration has got in a small province all the departments that we see in big presidencies like Bombay or Madras. But the likeness in the form of the administration does not guarantee an equal efficiency in its quality. With all their short—comings, the Berar Government have however kept up an expensive machinery. The administration thus demands more money to spend and even though the people are not well off to meet such a heavy demand, a new taxation is devised to raise larger funds. Additions in taxation is welcome on the sole ground of a prosperous state of the people. We have often pointed out in these columns that the fact of real prosperity cannot mean to be a growing state of poverty. The people are extremely poor and have got no staying power in them. But they have to pay additional taxes in consequence of the growth in expenditure. There is a regular drain on the vital powers of the people. It, in fact, impairs their life—pulse. At the advent of the British administration system, order and safety brought home to the people larger revenues from their agriculture. But this process of expansion cannot withstand the opposing forces that gained new strength in the growth of the population, the killing of indigenous industries and the consequent over—crowding of the profession of agriculture. The expansion of material wealth came to a stand-still and there came a period of the poverty of the people. The last two famines have intensified the miseries of a helpless and almost hopeless people. Berar yields the annual revenue of a crore and a little than one-third. A glance at the abstract statement of the finance of the last thirty years will show that the revenues increase by leaps and bounds but the people do not exhibit similar signs of a growing prosperity. The way—out lies not only in the diminution of the expenses of administration which is only a negative remedy but positively in the multiplication of the sonrces of material wealth. Let us hope that the Government will help the people in immortalizing the Victorian era by enabling the people to earn more wealth and to stand better in the competition of the west with the east.

---

## वऱ्हाड

हवामान— पहाटेला थंडी वाटते. आणि दिवसां ऊन कडक तापतें. हवा आरोग्यकारक आहे पण रोगराई दूर राहील तरच सर्व गोष्टी !

उमरावतीला इरिगेशन कमिशनची मंडळी या आठवड्याच्या शेवटीं येणार आहेत.

तारीख १७ मार्च पासून लोअर हायरच्या परीक्षांस उमरावतीस सुरुवात होणार आहे.

ल्यॅांड रिकार्डांचे डायरेक्टर मि. फ्रान्सिस साहेब यांस येत्या एप्रिल पासून आठ महिन्यांची रजा देण्यांत आली.

मे. कुमार श्री हरभामजी डिपुटी कमिशनर यांचे मुक्काम येत्या आठवड्यांत येणें प्रमाणें होतील.

| तारीख | मुक्काम |
|---|---|
| २४ | पातूर |
| २५।२६ | आलेगांव |
| २७।२८ | चांदणीचतारी |
| १ मार्च | लाखनवाडा |
| २ ,, | खेट्री |
| ३ ,, | तामसी |

राव बहादूर बाळकृष्ण काशीनाथ जोशी असिस्टंट कमिशनर, हैद्राबाद हे पेनशन घतल्या नंतर निजाम सरकारच्या पदरीं आकौंटंट-जनरल होणार आहेत. हें ऐकून परम संतोष वाटतो.

---

## वर्तमानसार

कोण भयंकर तेल हें— बाकू नांवाच्या गांवीं ज्या मातीच्या तेलाच्या खाणी आहेत त्या खाणीस आग लागून त्या आज ६०–७० वर्षे एकसारख्या जळत आहेत. त्यांच्या आगीनें आणखी शेजरची एक विहिर पेटली. सुमारें १३॥ कोटी शेर तेल अकरा वर्षांत जळून आतां कुठें जागा कोरडी ठणठणीत झाली आहे. याच्याही पेक्षां कमालीचा सत्यानाश अरिझोना येथें झाला. तेथल्या तेलाच्या खाणींत दरसाल ४६०००००० शेर तेल जळत असून आज ४० वर्षे झालीं, अजून त्या विझल्या नाहींत ज्वाला अजून तितक्याच झपाट्यानें जळत आहेत. आणि विझण्यासाठीं आजपर्यंत केलेले सर्व प्रयत्न अगदीं व्यर्थ झाले. तेथली धग इतकी झाली आहे कीं, दहा मैलच्या कक्षेंत कं.णाचेंही झाडझुडूप किंवा प्राणी राहूं शकत नाहीं. हें तेल दुष्ट खरें, पण त्याची विभूती राजापासून तो रंकापर्यंत सारखी जागती आहे.

उंदरांनीं रुपये खाल्ले— कोरट तालुका नंदुरबार येथील पाटलानें ५० रुपये एका मडक्यांत घालून तें मडकें भिंतींत कोनाड्यांत पुरून ठेविलें होतें. अलिकडे त्यास गरज पडल्यावरून मडकें पाहण्यास गेला तों मडकें फुटलेलें निघालें व आंत फक्त २५ रुपये सांपडले. ह्या पंचवीसा पैकीं रुपये ९ कुरतडलेले असून १६ रुपये जशाच्या तसेच होते. हे कुरतडलेले रुपये पहाण्या बरोबर उंदराशिवाय दुसरें कोणाचें कृत्य नाहीं अशी त्याची खात्री झाली ह्मणून उंदराचा शिरकाव कसा झाला याचा त्यानें तपास केला. तों त्यास ठेवलेल्या मडक्या जवळ बिळें दिसलीं, बाकीचे गेलेले २५ रुपयेही उंदरांनींच नेले असावे अशी त्याची कल्पना आहे व त्या रुपयांचा तो तपास करीत आहे.

पोहण्याची विद्या उंदीर शिकले—आज पर्यंत उंदीर पाण्यांत पडण्या बरोबर मेल्याचीं उदाहरणें आहेत. परंतु ते पोहून जातांना पहाण्यांत नव्हते. तोरखेडा व लव्हगांव याचे दरम्यान तापी नदी आहे. लव्हगांवचे उंदीर तोरखेड्यास व तोरखेड्याचे लव्हगांवास तापींतून पोहत पोहत पार जातांना पहाण्यांत आले ! ! हे उंदीर अनेक रंगाचे घुशी एवढे मोठे असून त्यांचे सुळे बाहेर आलेले होते.

महा धाडसी पोर– बोर लोकांचीं मुलें सुद्धां आपल्या बापजाद्याप्रमाणेंच फार निधड्याछातीचीं कामें करितात. थोड्या दिवसांपूर्वीं इंग्लिश फौजेची एक टोळी बोर टोळीशी लढत असतां त्या टोळींतून ६ वर्षाच्या उमरीचें एक बोर मूल इंग्लिश टोळीचा कमांडर जेथें होता, तेथें आलें, हें पोर तेथें खेळत खेळत आलें असेल, असें समजून त्यानें त्याकडे विशेष लक्ष दिलें नाहीं; परंतु इतक्यातच ह्या बोर छाव्यानें अगदीं जवळ येऊन एकदम खिशांतून पिस्तूल काढिलें आणि गोळी घालून ह्या इंग्लिश कमांडरचा प्राण घेतला ज्या लोकांचीं मुलें सुद्धां इतकीं तिखट, ते बोर लोक आमच्या सरकाराबरोबर आज दोन वर्षे लढत आहेत ह्यांत नवल तें काय !

उदार मनुष्य—मि० जार्ज इनूव्हिरटी नांवाच्या दोन वर्षांपूर्वीं परलोकवासी झालेल्या एका सिव्हिलियन यूरोपियनानें हिंदुस्थानांतील कांहीं जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना जनावरें, बियाणें आउतें वगैरे करितां मदत करण्यासाठीं सुमारें ३० हजार रुपये ठेवले आहेत. हिंदुस्थानच्या लोकांविषयीं कृतज्ञ बुद्धि ठवणारे युरोपियन विरळाच !

मत वैचित्र्य—चिकागो येथें एक नवीन संस्था निघाली आहे. झोप होईल तितकी कमी करावी, असें केल्यानें मनुष्य जास्त चपळ, जास्त निरोगी, व जास्त तरतरीत होतो, असें या संस्थेस वाटत असून उगीच झोंप घेणें आळशी माणसाचें काम आहे, असें तिचें मत आहे. या संस्थेच्या सभासदांनीं रोज चार तासांपेक्षः जास्त निजावयाचें नाहीं अशा आणाशपथा घेतल्या असून आपल्या मुलांसही ते अगदीं कमी निजण्यास शिकविणार आहेत. चमत्कार आहे.

७५ मुलांची माता—मेडिकल एक्झामिनर नांवाच्या मासिक पुस्तकांत असें प्रसिद्ध झालें आहे कीं एका विमा कंपनीकडे एक मनुष्य विमा उतरविण्यासाठीं आला होता तेव्हा त्यानें आपली हकीकत सांगितली कीं माझे आईबाप जिवंत असून मला एकंदर ७४ भाऊ बहिणी आहेत व माझ्या आईस एकाच वेळेस ५ मुलें झालीं. सर्वांपैकीं ३१ भाऊ ६ महिन्यापूर्वीं कालऱ्याच्या तडाख्यानें मरण पावले.

गर्दीत मृत्यु व दुखापत–जगन्नाथपुरी येथें जयपूर महाराजांचे वतीनें भिक्षा घालण्यासाठीं देवळाचा दरवाजा उघडला तेव्हां इतकी गर्दी झाली होती कीं दहा इसम त्या गर्दींत मेले व साताना जखमा झाल्या आहेत.

प्रचंडतरता किल्ला— ऑडेसा येथें रशियन सरकारानें आपल्या आरमारासाठीं एक अत्यंत प्रचंड लढाऊ बोट तयार केली असून तिची लांबी तीनशें सत्तर फूट आहे. आणि तिजवर मोठ्या तोफा लावल्या आहेत. सदर्हू प्रचंड लढाऊ बोटीचा उपयोग रशियन ॲडमिरल आपल्या किनाऱ्याचे बचावाचा तरता किल्ला ह्मणून तिला तासास सोळा मैल प्रमाणें चालविणार आहेत.

बावीस मजली आफीस– न्यू यार्कमध्यें बावीस मजली आफिस बांधण्याचें ठरलें आहे आणि त्याला ८ लक्ष खर्च येईल असा अदमास आहे.

चमत्कार– बेंगलें शहरापासून ३।४ मैला वर "बागलांची राई" नांवाचें लहान खेडें आहे, तेथें शंभर सवाशें वर्षांपूर्वींचा एक "चिदानंद स्वामींचा" मठ आहे. समाधी वर ५।६ हातांची लांकडी तुळई अभिषेक पात्र टांगण्याकरितां ठेविलेली आहे तींतून प्रतिवर्षीं माघ वद्य १४ महाशिवरात्रीच्या दिवशीं पाणी गळण्यास सुरवात होते. तुळईच्या दोन्ही बाजूंच्या टोंकाकडील हात किंवा दीड हात लांकूड कोरडें असतें व पुढें दोन्ही बाजूंनीं एक एक थेंब पाणी जमत येऊन, मध्यभागीं आल्यावर खालीं टांगलेल्या अभिषेक पात्रांत पडतें. मृग नक्षत्राच्या पूर्वीं ह्मणजे बहुतेक पावसाळ्याच्या पूर्वीं तें गळण्याचें बंद होतें विशेष चमत्कार हा कीं, सबंध पावसाळ्यात किंवा हिंवाळ्यांत तेथें पाण्याचा थेंब सुद्धां नसतो. आणि बहुतेक उन्हाळ्याचे ३।४ महिने मात्र पाणी असतें.

नवीन काळजी–दक्षीण आफ्रिकेपेक्षां आयर्लंडची जास्त काळजी घेतली पाहिजे; इंग्लंडचें वर्चस्व आयर्लंडांत राहण्याची तजवीज केली पाहिजे. या बाबतींत हयगय केल्यास ब्रिटिश साम्राज्यावर भयंकर संकट कोसळेल असें लार्ड सालिसबरी यांनीं बोलून दाखविलें.

## ट्रान्सवाल लढाई

ही अद्याप चालूंच आहे ह्यांत कांहींच आश्चर्य नाहीं. कोणी मध्यस्ती करो वा न करो, जों पर्यंत बोअर लोकांस 'स्वातंत्र्य तुह्मांस दिलें' असें इंग्रज सरकार प्रसिद्धपणें सांगणार नाहीं तोंपर्यंत ते लोक कधींहि आपल्या हातचें शस्त्र खालीं ठेवणार नाहींत. ते मोठे निश्चयी धीर व शूर वीर आहेत व त्यांस स्वदेशच्या स्वातंत्र्या खेरीज अन्य गोष्ट कोणचीच प्रिय नाहीं याची खात्रीहि पटून चुकली आहे. त्यांचे योद्धे पहावे तों एकापक्षां एक रथी महारथी अवतरलेले दिसतात. इतिहासांतरीं सुप्रसिद्ध ह्मणून नाणवलेले महाधाडसी व नशीब बहादर जे हॉनिबॉल, सीझर आदिकरून रणगाजी होऊन गेले त्यांच्याच तोडीचा बोअर सरदार डिवेट हा होय. ह्याचीं अचाट कृत्यें पाहून शत्रुपक्षीय लोक आश्चर्यानें तोंडात बोट घालतात. अशा सिंहाशीं सामना देण्यास उभे राहणारे लोक भितीनें थरारून जाऊन त्यांचीं शस्त्रें गळतील यांत शंका नाहीं.

तरी पण आमच्या इंग्रज सरकारच्या अभेद्य सेनाबलामधील सिंह एकदां कां मोकळे सुटले कीं सर्व बोअर सिंहास खाऊन टाकतील हेंहि विसरतां कामा नये. इंग्रजी सेनेची सर्व देशभर मुंग्या प्रमाणें रव लागून गेली आहे. बोअर लोकांचें स्वतंत्र्य आता कोरडेंच उरलें आहे. पण ते सुद्धां इंग्रज हट्टास पेटल्यावर कबूल करणार नाहींत. खरें पाहतां बोअर लोकांची सर्व ऐश्वर्यसंपदा केव्हांच त्यांस सोडून गेली आहे. त्यांचें अंगांतलें तें तापट रक्त व गर्वोक्ति हींच फक्त कायम आहेत. इंग्रजहि त्यांच्या पाठीस हात धुऊन लागले आहेत. व कोणी तरी महा थोर राष्ट्रानें योग्य वेळीं मध्यस्ती केली नाहीं व आपली भीड खर्चून इंग्रजांस बोअर लोकांचें नामशेषच स्वातंत्र्य कबूल करण्यास लाविलें नाहीं तर बेफाम झालेले बोअर लोक ह्या पृथ्वीच्या पाठीवर मागें पुढें उरतील अशी आशा करणें वृथा होय.

आतां इंग्रज बादशहास राज्याभिषेक होण्याची मंगल वेळ समीप आली आहे. अशा अपूर्व समयीं बोअर लढाईचा विषबिंदू सर्व सुखात माती कालवील ही मोठी चिंता आहे. ह्यासाठीं ही लढाई बंद होईल तर बरें अशी सर्व मुत्सद्दी मंडळांस उत्कट इच्छा आहे. लढाईमुळें करोडो रुपयांची व माणसांची व्यर्थ नासाडी होत आहे. इंग्रजांच्या राज्यतृष्णेस व बोअरांच्या स्वातंत्र्यप्रीयतेस थोडा थोडा आळा पडेल व रुचेल होईल अशी तोड एखाद्या राष्ट्रानें काढल्यास ती चांगली सिद्धीस जाईल असा भरंवसा आहे.

बंगलोरपासून चिक्कबाळापूरपर्यंत लाईट रेलवेचा रस्ता करण्याची परवानगी म्हैसूरसरकारानें तिकडील एका नेटिव श्रीमान गृहस्थास दिली आहे. एका नेटिवाचे भांडवलावर इकडे तयार होणाऱ्या रेलवेचें हें पाहिलेंच उदाहरण होय.

'आयरिश लोक ब्रिटिशसाम्राज्याचे उघड उघड शत्रू असल्यामुळें त्यांना वेगळें पार्लमेंट द्यावें, हें मत मी कधींहीं मान्य करणार नाहीं; व याच कारणामुळें लिबरल व आयरिश नॅशनॉलिस्ट या दोन्हींचें ऐक्य होणें आतां सर्वथा अशक्य आहे' असें लॉर्ड रोजबरी यांनीं लिवरपूल येथें बोलून दाखविलें.

हिंदुस्थानांतील प्राचीन वाङमय, इतिहास व शास्त्रें यांचे अध्ययनाचा इंग्लंडमध्यें प्रसार करण्याचे हेतूनें तिकडील ईटन, हॅरो वगैरे सार्वजनिक शाळांतील वरील विषयांवर उत्तम निबंध लिहिणाऱ्यांस बक्षीसे पदकें वगैरे देण्यासाठीं मद्रास इलाख्यांतील कोचीनचे महाराज, महाराजा गणपतीराव, व परलाकिमडीचे राजे यांनीं १८३७५ रु. इंग्लंडांतील रॉयल एशियॅटिक सोसायटीकडे पाठविले. आमच्या इकडील विद्यार्थी आतां प्राचीन वाङमय, इतिहास, वगैरे विषयांत प्रविण झाले ह्मणुन आतां इंग्लंडकडे धांव घेतली कीं काय ?

---

नोटीस.

रा. रा. गेलाभाई मारमल शेट राहणार बाळपूर, बाळापूर जिनिंग फ्याक्टरीचे मालक. यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं तुह्मी नोटीस दिलेली पावली. त्या हुकुमा प्रमाणें मी हिशोब करण्या करितां आलों असता माझ्याशीं केलेल्या करारा प्रमाणें तुह्मी हिशोब केला नाहीं. व तुमचे इच्छ प्रमाणें जे रुपये माझ निघत असतील ते मला द्या, तितक्या पुरती मी रसीद देण्याला तयार आहे, बाकी जितका वाद राहील तेवढ्याचा निकाल मी योग्य रीतीनें करून घेइन, असें सांगितलें असतां तुह्मी आतां तुह्माला कांहीं देत नाहीं, तुह्मी सर्व निकाल योग्य रीतीनें करून घ्यावा असें सांगितलें. पुन्हां तुह्माला विनंती करतों कीं, तुमच्या हिशोबानें जे पैसे निघत असतील ते द्या, अगर मनीआरडर करून मला पाठवा. असें तुह्मी आठ दिवसांच्या आंत न केल्यास सर्व खर्चाचा बोजा तुमच्यावर पडेल. कळावें. तारीख १९ फेब्रुवारी सन १९०२ इ.वी.

सही ( गुजरार्थीत )
खिमजी रणछोड इंजिनेर रहाणार
बाळापूर. दस्तुर खुद.

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी [illegible] यांचे "वऱ्हाडसमाचार" छा[illegible] आपा नारायण खंडेराव फडके यांनीं [illegible] सारखे केलें.